## सुविचार

आपके अपने स्वभाव के सिवाए कोई आपको दुःख नहीं देता । अपना स्वभाव मधुर व प्रेमयुक्त बनायें तथा सबका दिल जीतें ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शनिवार दि. १७ ऑगस्ट २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१७८ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


## बांगलादेशाचे पंतप्रधान मुहम्मद युनूस यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन दिले आश्वासन

नवी दिल्ली - शेजारील हिंसाचारग्रस्त बांगलादेशातील परिस्थिती लवकरात लवकर पूर्ववत व्हावी, अशी इच्छा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल (१५ ऑगस्ट) लाल किल्ल्यावर व्यक्त केली होती. त्यानंतर, आज बांगलादेशाचे अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन केला आणि येथील अल्पसंख्याक हिंदूंची सुरक्षा सुनिश्र्चित केली आहे. मोदींनी यासंदर्भात ट्वीट करून माहिती दिली.



प्राध्यापक मुहम्मद युनूस यांचा दूरध्वनी आला. प्रचलित परिस्थितीवर विचारांची देवाणघेवाण केली. लोकशाही, स्थिर, शांततापूर्ण आणि प्रगतीशील बांगलादेशासाठी भारताच्या पाठिंब्याचा पुनरुच्चार केला. बांगलादेशातील हिंदू आणि सर्व अल्पसंख्याकांचे संरक्षण आणि सुरक्षेचे आश्र्वासन त्यांनी दिले, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

मंगळवारी युनूस यांनी राजधानी ढाका येथील ढाकेश्र्वरी मंदिराला भेट दिली. तेव्हा त्यांनी बांगलादेशातील हिंदूंशी संपर्क साधला होता. माजी पंतप्रधान शेख हसीना यांची हकालपट्टी झाल्यानंतर नुकत्याच झालेल्या हिंसाचारात अल्पसंख्याकांवर हल्ले करणाऱ्यांना शिक्षा करण्याचे आश्र्वासनही त्यांनी दिले.

५ ऑगस्ट रोजी शेख हसीना यांच्या अवामी लीग सरकारच्या पतनानंतर बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंना ५० जिल्ह्यांमध्ये २०० हून अधिक हल्ल्यांना सामोरे जावे लागले आहे. पोलीस यंत्रणा कोलमडल्याने, हिंदू कुटुंबे, संस्था आणि मंदिरांवर झालेल्या हल्ल्यांमध्ये अनेकांना प्राण गमवावा लागला. बांगलादेशच्या काळजीवाहू **(पान ५ वर)**

## नाशिकमध्ये सकल हिंदू मोर्चावेळी तुफान दगडफेक

नाशिक : प्रतिनिधी- नाशिकच्या भद्रकाली परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या भागात दगडफेक झाल्यामुळे तणाव निर्माण झाला आहे. नाशिकच्या भद्रकाली परिसरात दोन गटांमध्ये मारहाणीचा प्रकार घडल्यानंतर दगडफेक झाली होती, यानंतर पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळविले.

नाशिकच्या भद्रकाली भागामध्ये दोन गट समोरासमोर आले आणि त्यानंतर तुफान दगडफेक सुरू झाली. दगडफेकीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्जचाही वापर करावा लागला आहे, तसंच अश्रूधुराच्या नळकांड्याही फोडल्या आहेत. यामुळे भद्रकाली परिसरात तणावाचं **(पान ५ वर)**

## हरियाणामध्ये एक तर जम्मू-काश्मिरमध्ये तीन टप्प्यात निवडणूक, ४ ऑक्टोबरला निकाल

मुंबई : हरियाणा आणि जम्मू काश्मिरच्या विधानसभा निवडणुकीसंदर्भात निवडणूक आयोगाने मोठी घोषणा केली आहे. हरियाणामध्ये एक टप्प्यात निवडणूक होणार असून १ ऑक्टोबर रोजी मतदान घेण्यात येईल. तर जम्मू काश्मिरमध्ये तीन टप्प्यात निवडणूक होणार आहे. या दोन्ही निवडणुकांचा निकाल ४ ऑक्टोबर रोजी जाहीर होणार आहे. महाराष्ट्राबाबत मात्र कोणतीही घोषणा करण्यात आली नाही.

केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, जम्मू काश्मिरमध्ये पहिला टप्पा १८ सप्टेंबरला, दुसरा टप्पा २५ सप्टेंबरला आणि तिसऱ्या टप्प्यात १ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. त्याचा निकाल ४ ऑक्टोबरला लागणार आहे. महाराष्ट्र विधानसभेची मुदत ही २६ नोव्हेंबर रोजी संपणार आहे. तर हरियाणा विधानसभेची मुदत ही ३ नोव्हेंबर रोजी संपणार आहे. तसेच जम्मू आणि काश्मिरच्या निवडणुकीसंबंधी ३० सप्टेंबरपूर्वी निवडणूक घोषित करा, त्याचे नियोजन करा असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले होते.

हरियाणाच्या ९० जागांसाठी मतदान

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, हरियाणात एकूण ९० विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यापैकी ७३ सर्वसाधारण, SC-१७ आणि ST-० आहेत. हरियाणात एकूण २.०१ कोटी मतदार असतील. त्यापैकी १.०६ पुरुष, ०.९५ कोटी महिला, ४.५२ लाख नवीन मतदार आणि ४०.९५ लाख युवा मतदार आहेत. हरियाणाची मतदार यादी २७ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध होईल.

जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभेच्या किती जागा आहेत?

जम्मू आणि काश्मीर हा विधानसभा असलेला केंद्रशासित प्रदेश आहे. पूर्ण राज्याचा दर्जा रद्द केल्यानंतर तेथील विधानसभेचे चित्रही बदलले आहे. आता जम्मू-काश्मीरमध्ये ११४ जागा आहेत, त्यापैकी २४ जागा पाकव्याप्त काश्मीरमध्ये येतात. अशा प्रकारे केवळ ९० जागांवर निवडणूक होणार आहे. ९० **(पान ५ वर)**

## सणासुदीमुळे महाराष्ट्रातील निवडणुका उशिरा

नवी दिल्ली : केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आज हरियाणा आणि जम्मू-काश्मीर या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकीसाठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. मात्र दरवेळी हरियाणासोबत होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक लांबणीवर का टाकण्यात आली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याबाबत केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी स्पष्टीकरण दिले असून जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुका घेण्यासाठी आवश्यक असलेल्या यंत्रणेचा विचार करून आणि महाराष्ट्रातील सण-उत्सव लक्षात घेत निवडणूक उशिरा घेण्यात येत असल्याचे स्पष्टीकरण कुमार यांनी दिले आहे.

मागील पंचवार्षिकला महाराष्ट्र आणि हरियाणा या दोन राज्यांच्या निवडणुका एकत्र झाल्या होत्या, मग यावेळी महाराष्ट्राच्या निवडणुकांना उशीर का? असा प्रश्न पत्रकार परिषदेदरम्यान राजीव कुमार यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले की पूर्वी महाराष्ट्र आणि हरियाणाच्या निवडणुका एकत्र झाल्या होत्या. ३ नोव्हेंबर ही हरियाणाची तारीख असून महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपत आहे. मात्र मागच्या वेळी जम्मू-काश्मीरमधील निवडणुका हा मुद्दा नव्हता. यंदा ४ राज्यांच्या विधानसभा निवडणुका **(पान ५ वर)**

## सत्य साई बाबा इन्फ्रा वेंचर्स तर्फे साई फार्म येथे वृक्षारोपण



लातूर / प्रतिनिधी- सध्य परिस्थितीत पृथ्वीवर वाढत जाणारी लोकसंख्या, प्रदूषण आणि औद्योगीकरण या सर्वांचा फटका निसर्गास बसत आहे व यामुळेच वातावरणातील असंतुलन व तापमान वाढ यांचा सामना सर्वांना करावा लागत आहे.हे जर टाळायचे असेल तर पर्यावरण संतुलित ठेवण्यासाठी वृक्षारोपणाचा वाटा हा मोलाचा ठरेल. याच अनुषंगाने श्री सत्य साई बाबा इन्फ्रा वेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड चे सर्वेसर्वा व संस्थापक अध्यक्ष माननीय दिलीपरावजी माने यांच्या संकल्पनेतून ११०० रोपांची लागवड ज्यामध्ये १००० बांबू व १०० फळझाडे यांचे वृक्षारोपण लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे मॅडम व मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सगर साहेब, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मा.जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे मॅडम यांचे स्वागत सौ.सविता माने, सौ.सोनल माने व सौ. रमा माने यांनी केले तसेच श्री.अनमोल सगर साहेब, श्री.सोमय मुंडे साहेब यांचे स्वागत श्री.दिलीपरावजी माने, श्री.दिनेश माने व श्री.रितेश माने यांनी केले.

यावेळी प्रमुख अतिथींनी श्री सत्यसाई बाबा इन्फ्रा वेंचर्स प्रा.लि. यांच्या संचालक मंडळाचे वृक्षारोपणास घेतलेल्या पुढाकाराबद्दल अभिनंदन करण्यात आले.



**सुरेखाताई काळे 'आयएमए'चे माजी अध्यक्ष आणि शिवाई प्रतिष्ठानचे प्रमुख यांची डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी वैद्यकीय क्षेत्राच्या अनुषंगाने विविध विषयांवरही चर्चा करण्यात आली. या वेळी डॉ.शोभाताई निसाळे, डॉ.रामेश्र्वरीताई अलाहाबाद, ॲड. मीनाताई गायकवाड, डॉ.मिराताई कुलकर्णी, डॉ.दिप्तीताई देशमुख, डॉ.कलांताई जाधव, डॉ.क्रांती साबदे, डॉ. अंजलीताई कवठाळे, डॉ.प्रेरणा काळे, डॉ.मनिषाताई माकणीकर, डॉ.मिराताई देशमुख, सौ.मनिषाताई माकणीकर, डॉ. माकणीकर, डॉ.चारूताई उदगीरकर उपस्थित होते.**




# पाणी - तीर्थ , अन्न व प्रसाद यातील फरक महत्त्व कळणे म्हणजेच परमार्थ समजणे होय:ज्ञानराज

**ॲड. शाम कुलकर्णी**

औसा /प्रतिनिधी- अन्नपूर्णे सदापूर्णे शंकरा प्राणवल्लभे ज्ञानवैराग्य सिद्धार्थतम् भिक्षानदेहीच पार्वती, असे अन्नाचे महत्त्व आणि देवाच्या-सत्पुरुषयांच्या समाधी महाअभिषेकाच्यातीर्थाचे मोठे महत्त्व आहे ज्यामुळे अंतकरण शुद्धी होऊन सद्बुद्धी जागृती होते आणि माणूस साधनेशी एकरूप होतो असे चिंतन ह.भ.प. श्री ज्ञानराज महाराज माऊली यांनी मांडले.

औसा येथे नाथ मंदिरात ५ ऑगस्ट पासून सुरू असलेल्या श्रावणमास अनुष्ठानात सायंकाळी नित्य चक्रीभजन सेवेनंतर श्री ग्रंथराज ज्ञानेश्र्वरी च्या प्रवचनात महाराज बोलत होते. माणसाला भुकेला अन्न मिळणे जरुरीचे आहे पण भोजन अन्न जेवण आणि प्रसाद यात फरक आहे जसे की तहान लागल्यानंतर पाणी आवश्यक



आहे हे आपण जाणतो पण तीर्थ याचे महत्त्व आणि फलश्रुती ही वेगळी महत्त्वपूर्ण आहे तीर्थ आणि अन्नाने मन अंतकरण शुद्ध सात्विक बनते. व विचाराला योग्य सत्य आणि शाश्र्वत अशी दिशा मिळते. परमात्मा जवळ जाण्याकरता आधी आपल्यातले मी पण हे नष्ट झाले पाहिजे काही कर्म केले ते भगवंतास समर्पित करण्याची व निस्वार्थ बुद्धीने कर्तव्य कर्म करण्याची वृत्ती ही केवळ नामस्मरण सेवा तीर्थ प्रसाद यातून लाभ होऊ शकते या यावर महाराजांनी दृष्टांता आधारे विवेचन केले.

एखादे कार्य केले तर मी केले,मी केले असे म्हणणे मूर्खपणाचे ठरेल. आपण जसे पेराल तसेच उगवेल कर्म ही तसेच आहे जसे कर्म कराल तसे फळ मिळेल आणि फळाची अपेक्षा न करता सत्कर्म कराल तर आपल्याला इच्छा असेल अथवा नसेल फळ निश्र्चितपणाने लाभते असे महाराज म्हणतात. म्हणून मनस्थिती स्थिर ठेवावी बुद्धी स्थिर ठेवावी चांगले विचार करावे त्यातून चांगले कर्म घडतात मन प्रसन्न होते आणि स्थिरही होते आणि सत्कर्म सेवा साधना घडते असे ज्ञानराज महाराज यांनी सांगितले.

# जे सत्य शाश्‍वत चांगले ते देण्याची जबाबदारी आमची : ज्ञानराज

**ॲड. शाम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी- जे सत्य आहे,शाश्र्वत आहे ,चांगले आहे ..ते शिकवण्याची , देण्याची जबाबदारी आमची असेल फक्त आपण यासाठी विश्र्वासाने,स्वछ स्थिर मनाने व निर्धाराने तयार असले पाहिजे अशी ग्वाही ह.भ.प.श्री. ज्ञानराज महाराज यांनी दिली आहे.

औसा येथील नाथ मंदिरात ५ ऑगस्ट पासून सुरू असलेल्या सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या वार्षिक श्रावणमास अनुष्ठानात १५ ऑगस्ट रोजी चक्रीभजन उपासनेनंतर ग्रंथराज श्री ज्ञानेश्र्वरी वरील निरूपणात महाराज बोलत होते.

तेसा कर्तुत्वाचा मदु , आणि कर्म फळाचा आस्वादू , या दोहीचे नाव बंधू , कर्माचा की ...... तरी या दोहीचा विखी , जैसा बापू नातळे लेकी , तेसा हो न शके दुःखी , विहित क्रिया , ..... ओवी क्र. ५/६ या ओवीनुरूप क्रिया, कर्म,विश्र्वास, विनम्रता ,याच्या चिंतनात महाराज म्हणाले कुठल्याही चांगल्या क्रिया यामधून चांगलेच निष्पन्न होते सत्कर्माचे फळ हे निश्र्चितपणाने लाभतेच पण आधी आपले मन स्वच्छ शुद्ध , निर्मळ, शुद्ध, असून विश्र्वास दृढता व नियमितता यावर ते स्थिर असले पाहिजेत आपल्या जवळ अमूल्य वस्तू असते पण त्याची किंमत कळत नाही कारण आपण विश्र्वास ठेवत नाही आणि आपल्या अंगी विनम्र भाव आणि दृढता असत नाही. अस्थिर मन हे आपल्याला सत्कर्मापर्यंत पोहोचू देत नाही यावर आपण जागृत असणे आवश्यक आहे. जुन्या पिढीत प्रापंचिक वा परमार्थिक लोक हे आई-वडील, ज्ञानी गुनीजन मंडळी,संत सत्पुरुष , यांना आदरपूर्वक नमस्कार करायची ती पद्धत आणि सवय अलीकडल्या काळात लोप पावत चालल्याची खंत व्यक्त करीत महाराज म्हणाले जुने लोक आपल्या डोक्यावरील टोपी



फेटा पटका मुंडासे, हे काढून आपले डोके चरणावर ठेवून विनम्र आदरयुक्त भावनेने प्रेमाने विश्र्वासाने नमस्कार करीत होते ,आता ते धोतर साधी पॅन्ट चा जमाना गेला जीन पॅन्ट घालणारी पिढी आली त्यांना वाकणे झुकणे नम्रता आणि आदर याची पद्धती माहिती नाही किंवा माहिती असून देखील ती करण्याची प्रवृत्ती त्यांच्या वागण्यातून दिसून येत नाही. खरे तर झुकणे ही क्रिया विश्र्वास आणि नम्रता याचे प्रतीक आहे पण हा भाव देखील त्यांच्या कडे नसल्यामुळे त्यांना हवे ते शाश्र्वत सत्य आहे ते मिळणे शक्य होत नाही . त्याकरता आधी आणि नमस्कार यांची पद्धत याचे संस्कार व्हावेत आपण स्थिर बुद्धीने राहिला तर अंगी विनम्रता येईल, चांगले बनाल तर अंगी असलेला अहंकार जाऊन आपण सत्कर्म सेवेला पात्र ठराल असे श्री ज्ञानराज महाराज म्हणाले. आई-वडिलाजवळ, संत सत्पुरुषाजवळ, सद्गुरूंच्या समोर विनम्र शुद्ध भावनेने जावे आणि त्यांच्या चरणाचे दर्शन घ्यावे. लांबून हात करून पाया पडल्यासारखी कृती ही विनम्रतेची लक्षणे नाहीत हे स्पष्टपणे सांगितले. आपण विनम्र आहोत की नाही हे आपल्या आचरण कृतीवरून लक्षात येऊ शकते व आपला भाव देखील समजून येतो तेव्हा तरुण पिढीने आपल्या अंगी विनम्रता विश्र्वास सहनशीलता आणि आदर भाव हा जपणे गरजेचे आहे या सगळ्या गोष्टी अनुष्ठानाच्या माध्यमातून आपल्याला प्राप्त करता येतात आणि ते करण्यासाठीच पाच पिढ्यापासून ही परंपरा निरंतरपणे कार्यरत आहे, जे जे आपणास ठावे ते इतरांना सांगावे शहाणे करून सोडावे सकलजन, या समर्थांच्या वचनाप्रमाणे शाश्र्वत सत्य चांगले सन्मार्ग आणि कल्याणकारी आहे ते शिकवण्याची जबाबदारी ही या परंपरेची आहे आणि या परंपरेचा पाईक या नात्याने आम्ही आपणास नित्याचरण नित्यनेम नामस्मरण भगवंत सेवा गुरुसेवा याचे माध्यमातून देण्याचा निरंतर परिश्रमपूर्वक प्रयत्न करू. फक्त मनाची तयारी,स्थिरता, विश्वास दृढ संकल्प ठेवावा असे श्री ज्ञानराज महाराज म्हणाले.

# देवणी तहसील कार्यालय वरती शेतकरी संघटनेचा ट्रॅक्टर मोर्चा



देवणी-शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबितक मागण्यांसंदर्भात देवणी येथे शेतकरी संघटनेच्या वतीने तहसील कार्यालयावर शुक्रवार (दि १६) रोजी शेतकरी संघटना व शेतकरी बांधवांच्या वतीने हनुमान मंदिर ते देवणी शहरांमध्ये ट्रॅक्टर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये बोरोळ व देवणी परिसरातील सर्व ट्रॅक्टर मालक - चालक व शेतकरी बैलगाडीसह सहभाग घेतला होता. मागिल वर्षीच्या पिक विमा व इतर शेतकऱ्यांच्या मागण्यांच्या पार्श्र्वभूमीवर शेतकरी संघटना व शेतकरी बांधवांच्या वतीने ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

हि ट्रॅक्टर रॅली शुक्रवारी सकाळी अकरा वाजता हनुमान मंदिर देवणी येथुन रॅलीची सुरुवात करण्यात आली या रॅलीत ट्रॅक्टरसह शेतकरीबांधव सहभागी झाले होते. यावेळी श शेकडो शेतकरी या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होत ट्रॅक्टर रॅली देवणीतील मुख्य रस्त्यावरून काढण्यात आली.

देवणी येथील बोरोळचौक , मुख्य रस्ता , मुर्गी चौक, पंचायत समिती, , तहसील कार्यालय येथे रवाना झाली यादरम्यान देवणी -निलंगा -उदगीर मुख्य रस्त्याकडे जाणारी वाहतुक वाहतुकीसाठी कोणतीही अडचन नकरता पोलिस प्रशासनाने बंदोबस्त ठेवण्यात आला होता तहसील कार्यालय येथे शेतकरी संघटनेच्या वतीने निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले. शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले की, देवणी तालुक्यातील पंचनामे करूनही क्लेम मंजूर असुनही विमा न मिळालेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर कृषी विमा नुकसान भरपाई मिळावी व वन्य प्राण्यांपासून शेतीचे होणारं नुकसान थाबण्संयसाठी वन्य प्राणी संरक्षण कायदा रद्द करुन सर्व शेतकऱ्यांना १००% टक्के अनुदानांवर तारकुंपन देण्यात यावे,शेतीसाठी शेतकऱ्यांना दिवसा बारा तास उच्च दाबाने लाईट उपलब्ध करून देण्यात यावे, ग्रामीण बॅंका, सहकारी बॅंक या बेकायदेशीरपणे शेतकऱ्यांच्या बॅंक खाते होल्ड करून सक्तीची कर्ज वसुली करीत आहेत, तरी संबंधीत अधिकाऱ्यांवर बैंक संघटीत गुन्हेगारीचा गुन्हे दाखल करण्यात यावे व सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी देण्यात यावी, स्वामीनाथन आयोग लागु करावा,दुधातील होणारी भेसळ रोखुन गायीच्या दुधाला डिझेलचा भाव तर म्हशीच्या दुधाला पेट्रोलचा भाव देण्यात यावा, सोयाबीन पिकांच्या या वर्षी कमी दर मिळाला या फरकाच्या रक्कमेला सातबाऱ्यावरील पिकपेऱ्याची अट रद्द करावी व सरसकट सर्व शेतकऱ्यांना हि मदत जाहीर करावी व शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करावी., ऊसाला पाच हजार रूपये दर द्यावा अन्यथा दोन साखर कारखांन्यामचील हवाई अंतराची अट रद्द करण्यात यावी, या विविध मागण्यांचे निवेदन देऊन शेतकरी संघटनेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष आनंद जीवणे व युवा आघाडी उपाध्यक्ष सत्यदेव लक्ष्मण गरड यांच्या नेतृत्वात हि ट्रॅक्टर रॉली आयोजित करण्यात आली होती यावेळी उपस्थित शेतकरी संघटना कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य कालिदासजी आपेट ,शेतकरी संघटना उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य सुरेंद्र अंबुलगे ,युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष मिथुन दिवे ,मराठवाडा विभाग अध्यक्ष आनंद जिवणे उर्फ पृथ्वीराज पाटील व ज्येष्ठ शेतकरी नेते अमर मुर्के श्रीमंत अण्णा लुले योगेश तगडखेडे करीम भाई शेख चेतन मिटकरी संतोष जीवने मोरे पाटील उमाकांत जीवने मल्लिकार्जुन ईश्र्वर शेट्टी श्रीकांत धनुरे यांच्या उपस्थित हि ट्रॅक्टर रॉली कढण्यात आली .

२३ ऑगस्ट रोजी सर्व विभागांचे अधिकारीसह बैठक

शेतकरी संघटनेच्या वतीने दिलेल्या निवेदनातील विषयी सर्वा विभागांना कळवुन सर्व विभागांची शुक्रवारी (दि २३) रोजी एकत्रित बैठक घेऊन सर्व विषयांची चर्चा करुन सर्व विषय मार्गी लावण्याचे आश्र्वासन तहसील यांच्या कडून देण्यात आले.

# धर्माविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर / महंत रामगिरी महाराज यांनी नाशिकच्या सिन्नर तालुक्यातील पंचाळे गावामध्ये प्रवाचनाच्या दरम्यान एका धर्माविषयी वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यानंतर या वक्तव्यामुळे छत्रपती संभाजीनगरच्या वैजापूरमध्ये तणाव निर्माण झाला होता. वैजापूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये रात्री आठच्या दरम्यान जमाव आला आणि त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी टायरही जाळण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी महंत रामगिरी महाराज यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. मात्र, तरीही रामगिरी महाराज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत व्यासपीठावर पाहायला मिळाले. एका धर्माविषयी वादग्रस्त वक्तव्य करणारे आणि गुन्हा दाखल असूनही मुख्यमंत्री शिंदेंसोबत व्यासपीठ शेअर करणारे रामगिरी महाराज कोण आहेत? जाणून घेऊयात...

कोण आहेत रामगिरी महाराज?

वैजापूर तालुक्यातील कापूरवाडीचे भूमिपुत्र थोर संत सद्गुरु गंगागिर महाराज यांचा जन्म सन १८१४ साली झाला आणि सन १९०२ मध्ये त्यांचे महानिर्वाण झाले. त्यांनी वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) आणि श्रीरामपूर (जि.अहमदनगर) या दोन तालुक्यांच्या सीमांना स्पर्श करणार्या गोदाकाठावरील सराला बेटावर मठाची स्थापना केली. या बेटावरील त्यांचे कार्य पाहून प्रभावित झालेल्या वैजापूरच्या रुपचंद संचेती यांनी या बेटावरील त्यांची ६५ एकर सुपिक जमीन त्यांना दान केली. वारकरी संप्रदायाच्या समर्पक विचारधारेतून त्यांनी तत्कालीन निजामशाहीच्या जुलमी राजवटीत पिचलेल्यांना एकत्र केले. शिर्डीचे साईबाबा सद्गुरु गंगागिर महाराजांना गुरुस्थानी मानीत असतं. लोकांना संघटीत करण्यासाठी त्यांनी लोकसहभागातून सुमारे पावणे दोनशे वर्षांपूर्वी देवळा-रावळातून अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा रुजवली.




व्यसनमुक्त समाज, अस्पृश्य निर्मूलन यासारख्या गोष्टींवर या सप्ताहाच्या माध्यमातून भर दिला गेला. जगातील सर्वात मोठा धार्मिक उत्सव आणि त्यात दररोज सात दिवस अगदी नियोजनबद्ध पद्धतीने होणारे अन्नदान अशी ओळख असलेल्या गंगागिर महाराजांच्या सप्ताहाची दखल 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्येही घेण्यात आलेली आहे. त्यांनी सुरु केलेली ही परंपरा महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात आजही अखंडपणे सुरु आहे.

२००९ पासून रामगिरी महाराज 'या' पालखीचे भोई

सन १९०२ साली त्यांचे देहावसान झाल्यानंतर त्यांची ही परंपरा पुढे त्यांचे प्रियशिष्य दत्तगिरी महाराज यांनी सुरु ठेवली. तीच परंपरा त्यानंतरच्या श्रीनाथगिरी महाराज, सोमेश्वरगिरी महाराज, श्रीनारायणगिरी महाराज यांनी कायम ठेवली आणि २००९ पासून रामगिरी महाराज या पालखीचे भोई झाले आहेत. त्यांनी गेल्या पंधरा वर्षांत सरला बेटाचा केवळ धार्मिक क्षेत्र म्हणून विकास न करता पर्यटन क्षेत्र म्हणूनही या परिसराला साज चढवला आहे. येथून जवळच असलेल्या शनिदेव गाव या शनी महाराजांच्या जागृत ठिकाणाचाही त्यांनी कायापालट केला आहे. त्यामुळे सरालाबेट आणि शनिदेव गाव या ठिकाणी येणार्या भाविकांसह पर्यटकांच्या संख्येतही मोठी वाढ झाली आहे.

# लातूर विधानसभेसाठी संभाजी पाटील निलंगेकर यांनी तयार राहावे-आ.शिंदे यांची सूचना

निलंगा-(प्रतिनिधी)विधानसभेच्या तयारीच्या दृष्टीने निलंगा येथे आयोजित केलेल्या भाजप कार्यकर्त्यांच्या अधिवेशनात माजी मंञी आ.राम शिंदे यांनी काँग्रेला टक्कर देण्यासाठी लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी तयार राहण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यांच्या या सूचनेने राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत.



'पक्षाने ठवरलं तर तुम्हाला लातूर शहर विधानसभा मतदारसंघातूनही निवडणुक लढवावी लागेल.याबाबतही तयारी ठेवा,अशा सूचना माजी मंञी आ.राम शिंदे यांनी निलंगा येथे संभाजीराव पाटील निलंगेकर यांना केली. पुढे ते म्हणाले,विधानसभा निवडणुकीची उमेदवारी मिळविण्यासाठी अनेकवेळा जनतेला पसंती नसलेल्या उमेदवाराची उमेदवारी लादली जाते.माञ जनतेच्या मनातला उमेदवार असणे गरजेचे आहे.निलंगा विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या मनात कोण उमेदवार आहे.यासाठी या घातलेल्या या अधिवेशनाचा उपक्रम राज्याला दिशा देणारा आहे.

लातूर जिल्ह्यातून एकीकडे माजी मुख्यमंञी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर,माजी मुख्यमंञी विलासराव देशमुख,केंद्रीय मंञी शिवराज पाटील चाकूरकर काँग्रेसचे दिग्गज होते.येथील राजकारणात काँग्रेसचे वर्चस्व होते.अनेक वर्षापासूनचे असलेले वर्चस्व मोडून जिल्हा परिषद,महानगरपालिका,पंचायत समिती,बाजार समित्या,नगरपरिषदा भाजपाकडे खेचून आणल्या आहेत,असे माजी मंञी आ.राम शिंदे म्हणाले.

निलंगा येथे झालेल्या अधिवेशनात यावेळी माजी पालकमंञी आ.संभाजीराव पाटील निलंगेकर,प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर,माजी आ.गोविंद केंद्रे,जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख,अजित पाटील कव्हेकर,भगवान पाटील,रोहीत पाटील आदी जणांची उपस्थिती होती.

# माणुसकीचा वाहता झरा जीवनधर शहरकर गुरुजी

लातूरमधील जुन्या पिढीतील पत्रकार, राष्ट्र सेवादलाचे बिनीचे कार्यकर्ते राजस्थान विद्यालयातील नामांकित शिक्षक, हैदराबाद मुक्तिलढ्यातील स्वातंत्र्या सैनिक, घरोघर जावून 'साधना साप्ताहिक'चे वाटप करणारे जीवनधर शहरकर यांचे १३ मे २०२४ रोजी सकाळी निधन पावले. मृत्युसमयी त्यांचे वय ९५ वर्षे होते. त्यांनी देहदानाचा संकल्प केला होता. म्हणून एम.आय.टी. वैद्यकीय महाविद्यालयाने सायं. ५.३० वाजता देहदान स्विकारले. तेव्हा लातूर शहरातील व्यापारी, राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील शेकडो कार्यकर्त्यांनी गुरुजींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

शहरकर गुरुजी अजातशत्रू होते. प्रत्येक गरजू माणसाला सहकार्य करण्याचा मातृभाव त्यांच्यात होता. आज राजकारण, समाजकारण, व्यापार आणि प्रशासकीय क्षेत्रात गुरुजींनी संस्कारित केलेले कितीतरी विद्यार्थी सन्मानाने जीवन जगत आहेत. गुरुजींना पर्यावरणाचे विशेष प्रेम होते. गांधी-विनोबा-जयप्रकाश, सानेगुरुजी, बाबा आमटे ही त्यांची श्रद्धास्थाने होती. दरवर्षी आनंदवन व हेमलकसा येथे आपले डोनेशन पाठवित असत. तसेच राष्ट्र सेवादल द्वारा संचलित, 'आपलं घर'च्या निराश्रीत विद्यार्थ्यांसाठी नियमित देणगी देत असत. नियमितपणे दैनंदिनी लिहिण्याची त्यांची खूप जुनी सवय. त्यासाठी त्यांना सर्वोदय डायरीच लागत असे. बेडवर पडून असताना सुद्धा २०२४ ची सर्वोदय डायरी त्यांनी घेतली. आपल्या नव्वदीमध्ये सुद्धा प्रवासात आपले ओझे आपल्याच खांद्यावर घेवून जाण्याची त्यांची जिद्द राहत असे. नियमित शिवांबू सेवनामुळेच आपली प्रकृती ठीक असल्याचे ते ठामपणे सांगत असत.

जीवनधर शहरकर गुरुजीनी हैदराबादचा मुक्तिलढ्यात मोलाचे योगदान दिले. पू. बाबासाहेब परांजपे, फुलचंद गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली बॉर्डर कॅम्पवर शस्त्रास्त्रांची ने-आण करण्यात गुरुजींनी आपल्या तरुण वयात महत्त्वपूर्ण कार्य केले. बंदुकाची काडतुसे तयार करण्याच्या सोलापूर येथील कारखान्यात पिर्केरिक ॲसिडचा वापर करून त्यांनी काडतुसे तयार केली. तसेच हैदराबादच्या संग्रामात भूमिगत कार्यकर्ता म्हणूनही त्यांनी धाडसीवृत्तीने कार्य केले. वंदे मातरम् चळवळीत अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडीत झाले होते. म्हणून त्यांना कै. पंजाबराव देशमुख यांच्या शिक्षण संस्थेत आपले शिक्षण पूर्ण करावे लागले. त्यामुळेच गुरुजींना शासनाचा स्वातंत्र्यसैनिक ताम्रपट प्राप्त झाला होता. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून त्यांना स्वातंत्र्यसैनिकाचे वेतनही मिळत असे. मानधनामधील बरीचशी रक्कम ते सार्वजनिक कार्यासाठी देणगी म्हणून देत असत.



आपली पत्नी श्रीमती हेमलताताई कॅन्सरने आजारी असताना गुरुजींनी उत्तम सेवा बजावली. लातूर शहरातील हे एक आदर्श असे जोडपे होते. कौटुंबिक जीवनात गुरुजी पूर्ण समाधानी होते. दोन मुले व दोन सुना, दोन मुली, नातू-पणतू यांच्या सहवासात गुरुजी अक्षरशः स्वतःला विसरून जात असत. नातू अक्षयने गुरुजीचा ८० वा वाढदिवस अत्यंत आनंदाने साजरा केला व गुरुजींच्या जीवनावर प्रकाश टाकणारा एक गौरवग्रंथही प्रसिद्ध केला.

'परोपकारार्थ जगणे' हा गुरुजींचा स्थायीभाव होता. महात्मा गांधींच्या विचारांचे ते कट्टर अनुयायी होते. ते दररोज हात चरख्यावर सूत कातून तयार झालेल्या सुताच्या गुंड्याच्या मोबदल्यात येणाऱ्या कापडातूनच आपला शर्ट शिवून घेत असत. स्वावलंबन व स्वाभिमान हा त्यांचा बाणा होता. बारीक सारीक हिशोब आणि व्यवहारात ते चोख असत. रसिकता ह्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुणवैशिष्ट्यांचा मी खूप जवळून अनुभवला आहे. पुण्यात होणाऱ्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवासाठी गेल्या पाव शतकापासून त्यांची नियमित हजेरी राहत असे. शहरात होणाऱ्या सर्व सांस्कृतिक, सामाजिक व शिक्षणविषयक कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित राहण्याची शिस्त त्यांनी शेवटपर्यंत पाळली. प्रा. डॉ. चंद्रकांत देऊळगावकर, वा. गं. बेंबळकर गुरुजी त्यांचे जिवश्र्च कंठश्र्च मित्र होते. भारत सरकारचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर जीवनधर शहरगुरुजींचे आवडते विद्यार्थी होते. शेवटपर्यंत मा. शिवराज पाटलांच्या मनात गुरुजींबद्दल आदरभाव होता.

माझा आणि गुरुजींचा १९७० पासून निकटचा संबंध. मी जेव्हा महाराष्ट्र सर्वोदय, मंडळाचा अध्यक्ष झालो. तेव्हा सर्व सेवा संघाच्या बैठकीसाठी वेगवेगळ्या प्रांतात दर तीन महिन्याला जावे लागत असे. मी सर्वोदय मंडळाकडून आतापर्यंत कधी प्रवासाचे किंवा अन्य बिल घेतले नाही. माझ्या खिशाला आर्थिक भार पडू नये म्हणून गुरुजी स्वातंत्र्य सैनिक म्हणून माझ्यासोबत येत असत. त्यांच्या सोबत एसीतून प्रवास व्हायचा. माझ्यासाठी ते पट्टीकल्याण (हरयाणा), गुवाहाटी (आसाम), गोंडल (राजस्थान), नवी दिल्ली, पाटणा (बिहार), केरळ, वर्धा-सेवाग्राम, आनंदवन आदी ठिकाणी आले. दाताच्या त्रासामुळे चार-पाच दिवसाच्या दुधातील दशम्या व दुधातील लाडू घेवून यायचे. गुरुजींनी माझ्याबद्दल व सर्वोदय चळवळीबद्दल वाटणाऱ्या आत्मीयतेनं केलेले सहकार्य व दिलेली साथ मी माझ्या आयुष्यात कधीच विसरू शकणार नाही. गुरुजींचे ग्रंथप्रेम अजोड असेच होते. प्रवासात जिथे जातील. तिथे २५०० ते ३००० रुपयांची पुस्तके खरेदी करण्यावर त्यांचा भर असे. ती पुस्तके आपल्या जवळच्या मित्रांना शुभ प्रसंगी भेट देत असत. माणसावर व माणुसकीवर भरभरून प्रेम करणारा एक सच्चा माणूस म्हणून लातूरच्या सार्वजनिक जीवनात जीवनधर शहरकर गुरुजींचे स्थान होते.

गुरुजींच्या वार्धक्यामुळे निधन झाल्याकारणाने समस्त लातूरकरांना जवळचे कोणीतरी हरवल्याची खंत आहे. त्यांच्या आत्म्यास शांती प्राप्त होवो. त्यांच्या कार्याचे स्मरण सदोदित तरुणांना प्रेरणादायी ठरो, हीच अपेक्षा !

**- डॉ. सोमनाथ रोडे लातूर,**
**मो. ७५१७९८५६९०**

# प्रभुराज प्रतिष्ठाणच्यावतीने आरोग्य शिबिर



लातूर / प्रतिनिधी- नाना नानी पार्क परिसरात शिवार्थक क्लिनिक लॅबोरेटरी अँड रिसर्च सेंटर व प्रभुराज प्रतिष्ठाण , लातूर च्या वतिने आरोग्य शिबीर संपन्न.

आरोग्य धन संपदा या वाक्या प्रमाणे,सर्वांचे आरोग्य हे चांगले असावे या निर्मळ उद्देशाने शिवार्थक क्लिनिक लॅबोरेटरी अँड रिसर्च सेंटर लातूर च्या वतिने तसेंच डॉ श्रीराम कोळेकर सर व प्रभुराज प्रतिष्ठाणचे संचालक ॲड.अजय कलशेट्टी साहेब यांच्या सहकार्याने नाना पार्क मध्ये मोफ़त रक्तातील साखरेचे प्रमाण तसेच मोफ़त आरोग्य तपासणी शिबीर संपन्न झाले. या ठिकणी नाना-नानी पार्क युनिक ग्रुप चे सदस्य तसेच सकाळच्या निसर्गरम्य वतावरणात फिरायला येणाऱ्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या शिबिराचा लाभ घेतला.

या वेळी शिवार्थक क्लिनिक लॅबोरेटरी ॲड. रिसर्च सेंटर संचालक श्री. दत्तात्रय गायकवाड,प्रभुराज प्रतिष्ठाण चे ॲड. अजय कलशेट्टी, डॉ.श्रीराम कोळेकर साहेब सहभागी टेक्निशिअन राजनंदिनी पासवान,प्रतिक्षा शिंदे,राखी कुसभागे,ओम लोया,सुरेश भुतडा,विलास भूमकर,संजय बागडे, एम. एम. पाटील,सीताराम हुंडेकरी, यु.एन. मश्ययायक, बंडाप्पा जवळे,हुसेन शेख, वैभव आळंदकर, नंदकुमार बनाळे,नागेश जाधव,प्रकाश साठे,मोतीराम कदम, सुनील कोटलवार, मुडपिकर, सर्व उपस्थीत होते.

# यशवंत धाराशिव जिल्हा

शनिवार दि. १७ ऑगस्ट २०२४




कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com

## राष्ट्रवादीचे प्रदेश संघटक पठाण यांच्या हस्ते ध्वजारोहण

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – तालुक्यातील ढोकी येथील स्वातंत्र्य दिनानिमित्त मदरसा जामे उलूम अक्रम सिद्दिकी नगरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश संघटक खालील पठाण यांच्या हस्ते दि.१५ ऑगस्ट रोजी करण्यात आले. धाराशिव तालुक्यातील ढोकी येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी सरपंच अमोल समुद्रे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर उपाध्यक्ष अल्ताफ मुजावर, मुख्तार शेख, असलम शेख, नाझीम मौलाना, अब्दुल रहमान कारी, हाफिज समदानी, हाफिज नाजिम, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.



## शंभराव्या नाट्य संमेलनानिमित्त धाराशिवमध्ये सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन

# प्रशासक राज लवकरात लवकर हटणे आवश्यक – खा.राजेनिंबाळकर








धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद आदीवर प्रशासकाचे राज आहे. लोकप्रतिनिधीला सामान्य लोकांच्या मताचा धाक असतो त्यांच्या अनुरूप कामे करणे आवश्यक असून पाच वर्षाला जनतेच्या सामोरे जावे लागत असते. ती कामे करण्यासाठी प्रशासक राज लवकरात लवकर हटणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हा खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी दि.१५ ऑगस्ट रोजी केले.

१०० व्या नाट्य संमेलनानिमित्त सांस्कृतिक महोत्सवाचे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा धाराशिव यांच्यावतीने आयोजन करण्यात आले आहे. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी आमदार कैलास पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विश्वास शिंदे, प्राचार्य डॉ जयसिंगराव देशमुख, संमेलनाचे स्वागताध्यक्ष धनंजय शिंगाडे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद धाराशिव शाखेचे अध्यक्ष विशाल शिंगाडे, सल्लागार राजेंद्र अत्रे, प्रशांत पाटील, आदींसह मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना खा राजेनिंबाळकर म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाच्या माध्यमातून लोकशाही पद्धतीने तयार झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये लोकप्रतिनिधी जाणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आ. कैलास पाटील म्हणाले की, या संमेलनाच्या माध्यमातून विशाल शिंगाडे यांनी स्थानिक कलाकारांना व त्यांच्या कलेला वाव दिला. तसेच जिल्ह्याला राष्ट्रीय पारितोषिक पटकावून आपला जिल्हा कशात ही मागे नाही हे दाखवून देण्याचे काम केले असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. तसेच मराठी नाट्य परिषदेला जागा उपलब्ध करून देण्यासाठी निश्चित पाठपुरावा करून ती उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन त्यांनी दिले.

प्रस्ताविकामध्ये धनंजय शिंगाडे म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासून जिल्ह्यामध्ये नाट्य चळवळ जोमात चाललेली दिसत आहे. त्यासाठी जिल्ह्यातील कलावंतांना संधी उपलब्ध करून दिली आहे. दिवसभर काम करून थकलेल्या नागरिकांना विरंगुळा असावा म्हणून नाटक व इतर कार्यक्रम इतर जिल्ह्यांमध्ये होतात. मात्र धाराशिव शहरातील नागरिकांना करमणुकीची मेजवानी मिळावी यासाठी नगर परिषदेच्या हद्दीत एक एकर जागा जिल्हाधिकारी व नगर परिषद यांच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावी अशी मागणी त्यांनी केली.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते नटराजाचे पूजन करून प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून व सिने अभिनेते दिवंगत विजय कदम यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्रारंभी सांगोला येथील शाहीर सुभाष गोरे यांचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील पोवाडा. कांगावा चित्रपटातील संतोष साळुंके यांनी आपले सादरीकरण केले. तसेच ढोकी येथील धावारे यांचे नृत्य तर देशभक्तीपर गीत व सांगोला येथील वाघ्या मुरळीचा कार्यक्रम सादर करण्यात आला. सूत्रसंचालन विशाल शिंगाडे यांनी व उपस्थितांचे आभार राजेंद्र अत्रे यांनी मानले. या कार्यक्रमास कलाकार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आज दि.१७ ऑगस्ट रोजी स्थानिक कलाकारांचे सादरीकरण, नाट्य परिसंवाद – डॉ. सुधीर निकम, सुगम संगीत – सुजित माने, पारंपारिक लावणी महोत्सव,ट्य परिसंवाद – डॉ. सुधीर निकम, सुगम संगीत – सुजित माने, पारंपारिक लावणी महोत्सव, कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात होणार आहेत.

## आयटीआय व जलसंपदाची जागा वैद्यकीय महाविद्यालयाच्या ताब्यात – आ. पाटील




धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व जलसंपदा विभागाची मोकळी जागा वैद्यकिय शिक्षण विभागाकडे प्रत्यार्पित करण्यात आली आहे. धाराशिवच्या तहसीलदारांनी ८ हेक्टर ३० गुंठे जागा शासकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार यांच्या ताब्यात दिली आहे. लवकरच या जागेवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची सुसज्ज इमारत उभारणार असल्याचे आ राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गालगत असलेली ही जागा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला. विद्यार्थी, रूग्ण आणि रूग्णांच्या नातेवाईकांच्या दृष्टिने ही जागा सोयीची आहे. मात्र काही जणांनी वैयक्तिक स्वार्थासाठी पोहनेर रस्त्यावरील खाणीजवळील अडगळीच्या जागेत वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू केले होते. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी याबाबत बैठक घेवून तातडीने जागा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास प्रत्यार्पित करण्याचे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने कौशल्य विकास व जलसंपदा विभागाकडून जागेचा ताबा महसूल विभागाने शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार यांच्याकडे सोपविला आहे. जागा ताब्यात आली आहे. आता या जागेवर सुसज्ज इमारत उभारण्यात येणार आहे. संकल्पना स्पर्धेच्या माध्यमातून इमारतीच्या उत्कृष्ट आराखड्याची निवड करण्यात आली आहे. त्याकरिता ५१३ कोटी रूपयांचा सुधारीत प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे दाखल करण्यात आला असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची ५ हेक्टर ३० गुंठे जागाही शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाच्या ताब्यात आली आहे. तुर्तास याच ठिकाणच्या उर्वरित जागेत आयटीआय सुरू राहणार आहे. पुढील काळात राष्ट्रीय महामार्गालगतच असलेल्या शासकीय तंत्रनिकेत महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेल्या अतिरिक्त जागेत आयटीआय स्थलांतरीत होणार आहे आणि त्यानंतर आयटीआयच्या ठिकाणी वैद्यकिय शाखेशी निगडीत असलेले दंत महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय, भौतिकोपचार शास्त्र, फार्मसी यासारखे अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. येथे एक परिपूर्ण अत्याधुनिक वैद्यकिय संकुल निर्माण करण्याचा आपला मानस असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले आहे. जलसंपदा विभागाच्या ३ हेक्टर जागेत वस्तीगृह, वैद्यकिय अधिकारी आणि कर्मचार्यांसाठी निवासस्थाने प्रस्तावित असल्याचेही त्यांनी सांगितले.

## श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेटच्या अभिनव उपक्रमाचे ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – येथील श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. धाराशिव संस्थेच्या दैनंदिन आर्थिक माहितीच्या माहिती फलक उद्घाटन माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते दि.१४ ऑगस्ट रोजी करण्यात आले.

धाराशिव येथील श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेट सोसायटीच्या मुख्य शाखेत संस्थेच्या दैनंदिन आर्थिक ताळेबंद दर्शविणाऱ्या माहिती फलकचे उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहकारी संस्थेचे सहाय्यक निबंधक धनाजी काळे, सहकार अधिकारी बालाजी सावतर, सहकार बोर्डचे मधुकर जाधव आदी प्रमुख उपस्थित होते.

श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेट संस्था मागील दशकांपासून धाराशिवकरांच्या विश्वासास पात्र ठरलेली असून २६ हजारांपेक्षा जास्त खातेदारांनी या संस्थेच्या माध्यमातून आपले समाधानी आर्थिक व्यवहार केलेले आहेत. तसेच संस्थेने आपल्या सर्व सभासद, खातेदार व ठेवीदार यांना आपली दैनंदिन आर्थिक स्थिती माहिती करून देण्यासाठी एका अभिनव उपक्रमाद्वारे दैनंदिन आर्थिक माहितीचा फलक संस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या बाहेर लाऊन नवीन आदर्श पारदर्शक व्यवहाराचा पायंडा निर्माण केला असल्याचे ठाकूर यांनी सांगितले. तर श्री सिध्दीविनायक पारिवारची समाजातील विश्वासाहर्ता, पारदर्शकता व नाविन्यपूर्ण उपक्रम या संपूर्ण परिवारासाठीच्या महत्वाच्या बाबी आहेत असल्याचे काळे यांनी नमूद केले. या कौतुकास्पद उपक्रमाचे स्वागत संस्थेच्या सर्व ठेवीदार सभासदांच्या माध्यमातून होत आहे. यावेळी संस्थेचे संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी, राजेश जाधव, प्रतिक देवळे, दिनेश कुलकर्णी, गणेश कामटे, ऍड. नितीन भोसले, अरविंद गोरे, जाहीर चौधरी, किशोर तिवारी, देविदास कुलकर्णी, नितीन हुंबे, लक्ष्मण शिंदे, प्रशांत वाघमारे, योगेश कुलकर्णी, रणजित भोरे, नितीन भोसले आदींसह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## झाडे लावण्यापेक्षा ती जगविणे आवश्यक – आ. पाटील




धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – झाडे लावून फोटो काढण्याचे काम मोठ्या प्रमाणात होत आहे. ती लावलेली जगली आहेत किंवा नाहीत ? याकडे कोणी ढुंकून देखील पाहत नाहीत. मात्र ८० वर्षीय पाशामियाँ शेख यांनी २५ वर्षापूर्वी दगडाच्या खदानीमध्ये मातीचा एक कण नसताना स्वतः माती विकत घेऊन त्या ठिकाणी वृक्ष लागून ती जगवून त्याचे नंदन वनात रूपांतर केले आहे. त्यामुळे झाडे लावण्यापेक्षा झाडे जगविणे आवश्यक असून ती जगवायची कशी ? याचा आदर्श शेख यांनी घालून दिला आहे. त्यामुळे प्रत्येकाने झाडे लावण्यापेक्षा ती जगवावीत असे आवाहन आ कैलास पाटील यांनी दि.१५ ऑगस्ट रोजी केले.

धाराशिव शहरातील एकता नगर भागातील बिस्मिल्लाह गार्डन येथे आ पाटील यांनी भेट देऊन या बागेची पाहणी करीत वृक्ष लागवड केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पाशामियाँ शेख, माजी नगराध्यक्ष मैनोद्दीन पठाण, शिवसेना शहर प्रमुख सोमनाथ गुरव, माजी नगरसेवक गणेश खोचरे, गफार शेख, आयुब शेख आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ. पाटील म्हणाले की, पाशामियाँ शेख यांनी फक्त वृक्ष लावलीच नाही तर ती जगवून दाखवली आहेत. देशात देखील दरवर्षी कोट्यवधी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविला जातो. मात्र ती प्रत्यक्षात जगविली जात नाहीत. त्यामुळे झाडे लावण्यापेक्षा ही जगविने अत्यंत महत्त्वाचे असल्याचे शेख यांनी त्यांच्या कामातून दिसून येत आहे. शेख यांनी.... देश के नाम, दो झाड... असा संदेश दिला असून त्यांचे काम निश्चितच तरुणांना लाजवेल असे आहे. त्यामुळे प्रत्येकाने दोन झाडे लावून ती जगविली तर पुढील पिढीला नक्की प्रेरणा निर्माण होईल असे त्यांनी सांगितले.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र येऊन काम करूया – पालकमंत्री सावंत

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) केंद्र आणि राज्य सरकारच्या अनेक योजना, उपक्रम, अभियान व मोहिमा आहेत. जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी योजना, उपक्रम, मोहिमा व अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सूक्ष्म नियोजनातून यंत्रणांनी काम करावे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी यासह सर्वांनी एकत्र येऊन काम करूया.असे प्रतिपादन पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी दि.१५ ऑगस्ट रोजी केले.

७८ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनाचे मुख्य शासकीय ध्वजारोहण जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.या कार्यक्रमाला स्वातंत्र्यसैनिक भास्करराव नायगावकर, बुबासाहेब जाधव, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत पुढे म्हणाले, शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांचा पुरोगामीत्वाचा वारसा जपत महाराष्ट्राने महिलांना केंद्रस्थानी ठेवून विकासाची वाटचाल सुरू केली आहे. लेक लाडकी योजना आणि आता राज्य सरकारची महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना , मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना,मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना यासह अनेक लोककल्याणकारी योजना सुरू केल्या आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना राज्य सरकारची अतिशय महत्त्वाकांक्षी योजना असून जिल्ह्यातील पात्र महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी यंत्रणांनी अतिशय काळजीपूर्वक घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले. त्यामुळे कोणतीही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहू नये यासाठी जिल्हाधिकारी यांनी अनेक वेळा संबंधित यंत्रणांच्या बैठका घेतल्या.२ लाख ८१ हजार ३२२ महिलांचे १४ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले.जिल्ह्यातील ३ लाख २४ हजारपेक्षा जास्त पात्र महिलांना लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला महिलांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा करण्यास सुरुवात झाली आहे.युवा वर्गासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राज्य सरकारने सुरू केली आहे. जिल्ह्यातील १०२ शासकीय कार्यालयांनी २२५८ पदे अधीसुचित केले असून आतापर्यंत प्रत्यक्ष ११० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थी प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी विविध कार्यालयात रुजू झाले आहे. उर्वरीत प्रशिक्षण पदासाठीची प्रक्रिया गतीमानतेने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील ज्या गावांमध्ये दहनशेड नाही तेथे दहनशेड बांधकामासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सन २०२३-२४ मध्ये २६ कोटी ७५ लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगून ना. सावंत म्हणाले, काही बांधकामे पूर्ण झाली व उर्वरित बांधकामे सुरू आहेत. ३६१ गावांमधून दहन किंवा दफनभूमीसाठी जागा उपलब्ध नसल्याने शासकीय जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्यापैकी २१० गावांमधून शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. खाजगी जागा थेट खरेदी पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन समितीतून ४ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला खरेदी प्रक्रिया काही गावात पूर्ण झाली असून उर्वरित गावातून देखील खरेदीची प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा मिळवून देण्यासाठी विविध आरोग्यविषयक योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सर्व आरोग्य संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांची आरोग्यविषयक तपासणी,उपचार व देखभाल करण्यात येत आहे. प्रधानमंत्री आयुष्मान भारत हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर मिशन योजनेअंतर्गत ५० खाटांचे क्रिटिकेअर युनिटच्या बांधकामासाठी २३ कोटी ७५ लक्ष रुपये अनुदान प्राप्त झाले आहे.३६१ कोटी रुपये निधीतून ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय बांधण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

माता सुरक्षित तर घर सुरक्षित या अभियानांतर्गत जिल्ह्यातील ६ लक्ष ४५ हजार २७ मातांची तपासणी करून त्यांना आवश्यक त्या आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यात आल्याचे सांगून प्रा.डॉ.सावंत पुढे म्हणाले, निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे ही मोहीम जिल्ह्यात राबवून ५ लक्ष ४८ हजार नागरिकांची आरोग्य तपासणी करून उपचार करण्यात आले. जागरूक पालक सुदृढ बालक या अभियानांतर्गत ४ लक्ष २० हजार बालकांची आरोग्य तपासणी करून २३७ बालकांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ३० सप्टेंबरपर्यंत जिल्हा संपूर्णतः अभियान राबविण्यात येत आहे.१२ आठवड्याच्या आत नोंदणी करणे,३० वर्षावरील सर्व नागरिकांची मधुमेह,उच्च रक्तदाब तपासणी व उपचार दर शनिवारी सर्व आरोग्य संस्थेत मेळाव्याच्या माध्यमातून करण्यात येत आहे.१ वर्षापर्यंतच्या बालकांचे संपूर्णता लसीकरण करण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

खरीप हंगाम २०२३ च्या दुष्काळात बाधित १ लाख २२ हजार शेतकऱ्यांना १४५ कोटी १३ लाख रुपयांचा निधी त्यांच्या बँक खात्यात वितरित करण्यात आल्याचे सांगून प्रा.डॉ.सावंत म्हणाले की, ई-पीक पाहणी प्रकल्प जिल्ह्यात राबविला जात आहे.ई- पीक पाहणी प्रत्येक शेतकऱ्यांनी नोंदवून घ्यावी. त्यामुळे कृषी पतपुरवठा करणे सुलभ होणार आहे. पीक विमा आणि पीक पाहणी दावे तात्काळी निकाली काढता येतील.पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई देताना ही माहिती उपयोगाची ठरणार आहे. जिल्ह्यातील ७०० रस्ते अतिक्रमण मुक्त करण्यात आले.या शेतरस्त्यांचा १७ हजार शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ६५३ किलोमीटरचे रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यात आल्याचे प्रा.डॉ.सावंत यांनी सांगितले.



मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या सुशिक्षित बेरोजगार युवक- युवतींसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून काम करण्यात येत असल्याचे सांगून प्रा. डॉ. सावंत म्हणाले की,जिल्ह्यातील २७४१ लाभार्थ्यांचे १८० कोटी रुपये कर्ज बँकांनी मंजूर केले.महामंडळाने १८ कोटी ४ लाख रुपये लाभार्थ्यांना व्याज परतावा केला.सन २०२३-२४ या वर्षात प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत नुकसानाकरिता ५ लक्ष ७२ हजार शेतकऱ्यांना २९७ कोटी रुपये विमा भरपाई वितरित करण्यात आली.महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ४४ हजार ६६४ शेतकऱ्यांना १३० कोटी ५८ लक्ष रुपयांचा लाभ देण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ११ हजार २४९ घरकुले, रमाई आवास योजनेअंतर्गत १३ हजार ३२४ घरकुले,शबरी आदिवासी आवास योजनेअंतर्गत ३०६ घरकुले पूर्ण झाली. मोदी आवास योजनेच्या २२७४ घरकुलांपैकी ४५० घरकुलाची कामे पूर्ण झाल्याचे प्रा.डॉ.सावंत यांनी सांगितले.

ध्वजारोहणानंतर ना. सावंत यांनी स्मृतिस्तंभास पुष्पचक्र वाहिली. पोलीस बँड पथकाने राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. कार्यक्रमाला स्वातंत्र्य सैनिकांचे नातेवाईक, ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिक, विविध विभागाचे अधिकारी - कर्मचारी, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालक पडवळ यांनी केले.

# श्री गुरुलिंगप्पा मंगलगे यांच्या जन्मशताब्दी निमित्त अनुभव मंटप लोकार्पण व बसव तत्त्वावरील लघुपट अनावरण सोहळा

निमित्त मा. गुरुलिंगप्पा मंगलगे यांच्या जन्मशताब्दीचं. मराठवाड्याची आणि महाराष्ट्राची कलात्मक व सांस्कृतिक क्षेत्राची राजधानी असलेल्या छत्रपती संभाजी नगरात गंगापूर तालुक्यातील दहेगाव बंगल्याजवळ नगर रस्त्यावर संपन्न झालेल्या अनुभव मंटप लोकार्पण व बसव तत्त्वावरील लघुपटाच्या अनावरण सोहळ्याचा अनोखा समारंभ. छत्रपती संभाजी नगरातील लिंगायत शरण फाउंडेशनच्या विचारांनी प्रेरित झालेल्या महात्मा बसवेश्र्वरांच्या सच्च्या तीन तरुण कार्यकर्त्यांनी घेतलेल्या ध्यासातून साकार झालेला अत्यंत देखणा सोहळा. रविवार दिनांक ११ ऑगस्टची रम्य सकाळ. सुमारे दीड हजार लोक बसू शकतील असा लोखंडी पत्राने आच्छादलेला आणि सजविलेला भव्य मंडप. संभाजीनगर शिवाय मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्ह्यातून आलेले बसवण्णा प्रेमी कार्यकर्ते. कार्यक्रमासाठी खास निमंत्रित केलेले अखिल भारत बसव समितीचे अध्यक्ष मा. अरविंद जत्ती, हिरेमठ संस्थान भालकीचे प्रमुख डॉ. बसवलिंग पट्टदेवरु महाराज, माजी खासदार मा. चंद्रकांतजी खैरे, माजी महापौर श्री नंदकुमार घोडेले, महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सचिव मा. माधवराव पाटील टाकळीकर, उत्सवमूर्ती शतकमान श्री गुरुलिंगप्पा मंगलगे गुरुजी. कार्यक्रमाचे आयोजक शरणभूषण श्री वीरेंद्र मंगलगे, प्रदीप बुरांडे व सचिन संगशेट्टी. समस्त स्त्री-पुरुषांनी भरलेलं तुडुंब सभागृह. बसवण्णाच्या सुमधुर वचनांच्या संगीतरम्य लयीत वातावरण अगदी भारावलेलं. प्रथम मान्यवरांच्या शुभहस्ते अनुभव मंटप लोकार्पण सोहळा संपन्न. अनुभव मंटपाच्या गाभाऱ्यात ध्यानस्थ बसवण्णाची भावमुद्रा व भोवताली भिंतीवर अनुभव मंटपातील वचनकारांची आकर्षक चित्रे साकारलेली. छत्रपती संभाजी नगरात बाराव्या शतकातील बसवण्णाची प्रतिसृष्टीच दहेगावच्या दोन एकरात साकार करण्याचा वीरेंद्र मंगलगे व त्यांच्या सहकाऱ्यांचा दृढ संकल्प. प्रथम मान्यवरांच्या हस्ते लिंगायतांच्या अष्टावरण ध्वजाचे अनावरण करण्यात आले. अनुभव मंटपाच्या तळघरात मनस्वी शांती देणारे ध्यानमंदिर ! सर्व मान्यवरांच्या हस्ते परिसरात बिल्व व अन्य वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

श्री गुरुलिंगप्पा मंगलगे यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने हा सुवर्णयोग जुळून आला. खरं पाहता आधुनिक श्रावण बाळ ठरलेले श्री वीरेंद्र मंगलगे यांनी दोन एकर जमीन लिंगायत शरण फाउंडेशनला दासोह रुपाने देऊन आपली कायकवृत्ती दाखवून दिली आहे. श्री गुरुलिंगप्पानी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही संघर्ष करीत आपली तीन मुले अनुक्रमे अशोक, महेंद्र व वीरेंद्र व दोन मुली सौ. ज्योती व सौ. जोत्स्ना यांना उच्च शिक्षण देऊन संस्कारित केलं. प्रतिकूलता शाप न मानता वरदान समजून जीवनातील आव्हानावर मात केली. जवळपास सेवानिवृत्तीनंतरचा चार ते साडेचार दशकाचा काळ त्यांनी ज्येष्ठांच्या समस्या सेवावृत्तीने सोडविण्यात घालविला. आपल्या सततच्या समाज उपयोगी कार्यातून त्यांनी आपले जीवन सार्थकी लावले.



प्रत्येकाला त्यांच्या जीवन जगण्यातील ही प्रेरणा आपल्या आयुष्यात घेण्यासाठीचा हा मंगलक्षण वाटला. लोकार्पण सोहळ्या प्रसंगी श्री राहुल नरवणे व त्यांच्या टीमने अत्यंत भावपूर्ण बसवण्णाच्या १२ व्या शतकातील जीवनशैली व तत्त्वज्ञानाची ओळख करून देणाऱ्या लघुपटाचे सादरीकरण खूप अवचित्यपूर्ण वाटले. या शुभप्रसंगी बोलताना डॉ. बसवलिंग पट्टदेवरू म्हणाले की, या शतकमान सोहळ्याच्या निमित्ताने आपल्या वडिलावर जीवापाड प्रेम करणाऱ्या वीरेंद्र मंगलगे सारख्या आदर्श मुलाचे दर्शन घडले. खरं पाहता आपले आई-वडील हेच आपले देव असतात. अलीकडे ९५% आई-वडिलांना आपल्या मुला-मुलींकडून प्रेम मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. श्री गुरुलिंगप्पा मंगलगे यांनी व्यक्तिगत कामासोबतच सार्वजनिक कामाला महत्त्व दिले. त्यामुळेच हा ऐतिहासिक अनुभव मंटप लोकार्पण सोहळा येथे संपन्न होत आहे. वीरेंद्र मंगलगे यांनी हे भरीव रचनात्मक कार्य करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. मराठवाडा व महाराष्ट्राला बसवण्णाच्या मानवतावादी विचारांचा प्रचार व प्रसार करणारे केंद्र येथे निर्माण होईल, अशी अपेक्षा डॉ. पट्टदेवरू महाराजांनी व्यक्त केली. संभाजीनगर सारख्या ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी हे केंद्र निर्माण झाल्याचे पाहून आपण संतुष्ट झाल्याचे प्रांजळ मत त्यांनी व्यक्त केले. बसव विचारांचा प्रसार नि प्रचार होण्याच्या दृष्टीने आपण लग्न समारंभ, वाढदिवसानिमित्त एकमेकांना बसव विचारांचे पुस्तक भेट देत जावे. कारण पुस्तक मस्तक संस्कारित करण्याचे कार्य करते. पुढे बोलताना डॉ. पट्टदेवरू म्हणाले की, श्री राहुल नरवणे यांनी बसव तत्त्वावरील लघुपटाची कलात्मक व रुदय स्पर्शी कलाकृती निर्माण करून एक महत्त्वपूर्ण कार्य केले, त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले. श्री वीरेंद्र मंगलगे यांनी आपल्या वडिलांचा माहितीपट न काढता बसवण्णाच्या जीवनावरील लघुपट काढला आणि या दोन एकर जागेचे लोकार्पण करून त्यावर बसवसृष्टी निर्माण करण्याचे जे ऐतिहासिक कार्य केले, ते विशेष आहे. महाराजांनी सर्व उपस्थितांना असे आवाहन केले की, महात्मा बसवेश्र्वरांच्या विचार व कार्याच्या प्रसाराची प्रेरणा सर्वांनी घ्यावी.

माननीय श्री अरविंद जत्तीसाहेब हे कार्यवाहक राष्ट्रपती बी. डी. जत्ती यांचे सुपुत्र. ते मूळचे इंजिनीयर. परंतु केल्या २५ ते ३० वर्षांपासून ते बसवमय झाले आहेत. आता ८० च्या वयातही ते भारतभर व जगभर भ्रमंती करून बसवण्णाच्या विचार नि प्रसाराचे कार्य झपाटल्यागत करीत आहेत. त्यांनी बसवण्णाचे 'वचन' साहित्य ३८ देशी व परदेशी भाषेत भाषांतरित करून सर्व जगाला विश्र्वगुरू महात्मा बसवेश्र्वरांची ओळख करून दिली आहे. ते अखिल भारतीय बसव समिती, बेंगलुरुचे अध्यक्ष आहेत. लोकार्पण सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून बोलताना मा. अरविंद म्हणाले की, एवढा

मोठा जनसमुदाय पाहून मी प्रसन्न झालो आहे. महात्मा बसवण्णा जसे थोर समाज क्रांतिकारक होते. तसेच ते एक महान तत्त्वचिंतक होते. महात्मा बसवण्णाच्या विचारात संपूर्ण जगाला बदलण्याचे व शांतिमय करण्याचे सामर्थ्य आहे. २१ व्या शतकात बसवण्णाना अभिप्रेत असलेली परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान झाली पाहिजे. प्रत्येकाच्या अंतःकरणात ते सामर्थ्य आहे. एक माणूस काय करू शकतो याचे उत्तर श्री वीरेंद्र मंगलगे यांनी दिले आहे. या ठिकाणी निर्माण झालेले अनुभव मंटप हे केंद्र केवळ मंदिर न बनता ते बसवण्यांच्या विचार-प्रसाराचे प्रभावी माध्यम व्हावे. बसवण्णाच्या विचारातून अंग आणि लिंगाचे सामरस्य होण्याची गरज आहे. प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात बसवण्णाच्या मानवतावादी विचारांची ज्योत प्रज्वलित व्हायला हवी. बसव समितीतर्फे जगभरातील अनुभव संपन्न लोकांना बसवभूषण, बसवरत्न म्हणून सन्मानित करतो. वीरेंद्र मंगलगे या तरुण बसववादी कार्यकर्त्यास आज या शुभप्रसंगी 'बसव विभूषण' ही उपाधी देऊन सन्मानित करतो. कारण त्यांनी हायवेवरील करोडो रुपयांची जमीन 'अनुभव मंटपा'साठी लोकार्पण केलेली आहे. महात्मा बसवण्णाचे विचार जगभर प्रसारित झाले पाहिजेत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. अमेरिका, इंग्लंड, न्यूझीलंड, अटलांटा आदि सर्व देशात बसवण्णाच्या विचारांचा प्रचार नि प्रसार होत आहे. हे संपूर्ण विश्र्व बसवण्णाच्या विचारांनी आमूलाग्र बदलावे, अशी माझी अंतरिक भावना आहे. दया, करुणा, सेवाभाव ह्यातच खरा धर्म सामावलेला आहे. आपण जगभर इष्टलिंग पूजेचे महत्त्व प्रतिपादन करीत भ्रमण करीत असल्याचे त्यांनी विशद केले.

श्रीमंती व गरिबीतील अंतर कमी करण्यासाठी समाजात 'दासोहवृत्ती' विकसित केली पाहिजे. कोणतेही वाईट कृत्य करण्यापूर्वी आपण बसवण्णाचे स्मरण करावे. श्री वीरेंद्र मंगलगे हे बसवण्णाच्या परिवर्तनवादी विचारांनी झपाटलेले तरुण आहेत. आपल्या अंतःकरणात बसवण्णाचा विचार पुरेपूर व्यापला असेल तर संपूर्ण भारताचे नि विश्र्वाचे अंतःकरण शुद्ध व पवित्र झाल्याशिवाय राहणार नाही, असा आत्मविश्र्वास त्यांनी दिला व जय बसवण्णा म्हणून आपल्या विचारांना विराम दिला. लोकार्पण सोहळ्यात मा. चंद्रकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले, श्री काका कोमटे, श्री माधवराव टाकळीकर, सरपंच श्री विक्रम राऊत, डॉ. सोमनाथ रोडे, श्री भाऊसाहेब काळे, श्री राजेश विभुते इत्यादींनी लोकार्पण सोहळ्यास शुभेच्छा देणारे मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी व्यासपीठावर श्री अविनाश भोसीकर, लोकमतचे बालाजी मुळे, माजी सभापती सौ. शोभाताई बुरांडे, राहूल नरवणे, रजनी राऊत, राजू जुबरे इत्यादीचा समावेश होता. कार्यक्रमाचे यशस्वी संचालन विशाखाताई रुपल, श्री युवराज कुलकर्णी यांनी तर आभार प्रदीप बुरांडे यांनी मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री वीरेंद्र मंगलगे यांनी आपल्या आई-वडिलांच्या व मित्र-सहकाऱ्यांच्या संस्कार व सहकार्यामुळेच व अप्पाजीच्या प्रेरणेने आपण बसवण्णाच्या कार्याकडे प्रेरित झालो, हे प्रांजलपणे मान्य केले. लोकार्पण सोहळ्याप्रसंगी या वास्तूची निर्मिती देखभाल व संरक्षण करण्यात ज्यांनी मुलाचे योगदान दिले, त्यांचा शाल, सन्मान चिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्यात लघुपटाची निर्माते श्री राहुल नरवणे, दहेगावचे सरपंच श्रीमती रजनीताई व विक्रम राऊत, गुरुपादप्पा पडशेट्टी, सेवाव्रत्ती रणधीर ठाकूर, जुबेरखान पठाण, शेख सलीम, गणेश चौधरी (ठेकेदार), कुणाल माळशिखरे, निरंजन बंधीकर (मूर्तिकार), श्री आशिष, श्री गणेश वैद्य, प्रभाकर वैद्य, इंदुमती सावंत, श्री हुरणेअप्पा (भोजनप्रमुख) या सर्व कायकांचा सन्मान नि सत्कार अनेकांच्या काळजाचा ठाव घेऊन गेला. महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात प्रथमच अनुभव मंटपाची ही प्रशस्त वास्तू व भोवतालच्या परिसरात समृद्ध ग्रंथालय, अभ्यासिका, अतिथी केंद्र, उद्यान असा हा प्रकल्प विकसित करण्याचा लिंगायत शरण फाउंडेशनचा संकल्प आहे. भविष्यात बसववादी व मानवतावादी विचारांचा संदेश देणारे हे आगळे वेगळे केंद्र म्हणून विकसित करण्याचा श्री वीरेंद्र मंगलगे, प्रदीप बुरांडे आणि सचिन संगशेट्टीचा संकल्प साकार होवो, हीच शुभेच्छा. या युवा कार्यकर्त्यांना कोटी कोटी धन्यवाद !

**-डॉ. सोमनाथ रोडे**
लातूर मो. ७५१७९८५६९०

## कैलास नगर येथे अखंड शिवनाम जपाची सांगता



लातूर /प्रतिनिधी : लातूर तालुक्यातील हरंगुळ बुद्रुक येथेगुरुवार दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी श्रावण मासारंभानिमीत्त सुरु केलेल्या अखंड शिवनाम जप यज्ञाची सांगता रुद्राभिषेक करुन करण्यात आली.

यावेळी मागील अकरा दिवसांपासून रात्रं दिवस

ओम नमः शिवायचा २४ तास जप करणाऱ्या ३० भाविक भक्तांचा मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपसरपंच संतोष भाऊ शेळके आणि या परिसराचे ग्रा.पं. सदस्य चंद्रकांतजी खटके यांनी सलग ११ दिवस २४ तास शिवनामाचा जप करणाऱ्या सर्व भाविक भक्तांचे शुभेच्छा देऊन अभिनंदन केले. तसेच यावेळी सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हरंगुळ बु. चे सरपंच भिमाशंकर झुंजारे, सेवानिवृत्त सपोनि मनोहर बरुरे, बाबुराव शेळके, शिभप राजकुमार वाघमारे, शिभप विश्र्वनाथ झुंजारे यांच्यासह गोविंद नगर, सदाशिव नगर, माऊली, अभिजीत देशमुख नगर आणि कैलास नगरमधील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थी सहाय्यक मंडळास डॉ.नागोराव कुंभार यांची २५ हजारांची देणगी

लातूर,दि.१४:थोरविचारवंत,माजी प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांनी लातूरच्या विद्यार्थी सहाय्यक मंडळास २५ हजार रुपयांची देणगी देवून गरीब होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सहकार्य केले केल्याबद्दल त्यांचा मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

डॉ.नागोराव कुंभार यांनी त्रैमासिक विचारशलाकामधून लोकशाही,भारतीय संविधान,मानवी मूल्य जोपासण्याचे काम केले,तसेच शिक्षण क्षेत्रातही अनमोल कार्य केल्याची दखल घेवून सातारा येथील भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्थेच्यावतीने समाजभूषण पुरस्कार देवून खा.शरद पवार यांच्या हस्ते नुकतेच सन्मानीत करण्यात आले होते.या सन्मानाबद्दल विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते शाल,पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.नागोराव कुंभार यांनी विद्यार्थी सहाय्यक मंडळास २५ हजार रुपयांची देणगी दिली.

या प्रसंगी मंडळाचे सचिव प्राचार्य डॉ.नागनाथ मोटे, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.कुसुमताई मोरे, कोषाध्यक्ष प्रा.बालाजी पळसकर, सहसचिव विक्रम कदम, संचालक प्रा.फ.म.शहाजिंदे, ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे,प्रा.सुधीर साळुंके आदि उपस्थित होते.

## शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीच्या कारभाराची खातेनिहाय चौकशीचे आदेश

शिरूर अनंतपाळ : शिरूरआनंतपाळ येथील नगरपंचायतच्या वतीने गेल्या दोन तीन वर्षात अनेक विकास कामा मध्ये प्रचंड मोठा गैरव्यवहार झाला असल्याची तक्रार काँग्रेस पक्षाचे नेते बस्वराज मठपती व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांनी नगरविकास विभागाचे सचिव यांच्या कडे लेखी निवेदन करण्यात आली होती.

याची दखल घेऊन मा. जिल्हाधिकारी लातुर यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.

गेल्या दोन ते तीन वर्षात शिरूर अनंतपाळ शहरात नगर पंचायत मार्फत वृक्ष लागवड, पाणी पुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, पेव्हर ब्लॉक, विद्युतीकरण, स्मशानभूमी सुशोभिकरण आदी विकास कामा मध्ये भ्रष्टाचार झाला असुन हे कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याची तक्रार करून या कामांची चौकशी समितीची नेमणूक करावी अशी मागणी केली होती त्यानूसार नगरविकास विभागाचे सचिव यांनी लातूर जिल्हाधिकारी यांना चौकशी समिती नेमणूक करून खातेनिहाय चौकशी करावी व संबधितावर योग्य ती कार्यवाई करावी अशी सूचना केली आहे.

## लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यात जमा झाल्याने महिलांकडून आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त

लातूर / प्रतिनिधी- राज्यातील महायुती शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेतील पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा होत असल्याने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून महिलांच्या वतीने राज्य शासनाचे आभार व्यक्त करण्यात आले.

महिलांना आणि मुलींना आर्थिक स्वातंत्र्य मिळावे त्या आत्मनिर्भर व्हाव्यात आणि त्यांच्या आरोग्य पोषणामध्ये सुधारणा व्हावी यासाठी राज्यातील महायुती शासनाचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण महिलांच्या हिताची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना सुरू केली असून या योजनेत पात्र असलेल्या महिलांना दरमहा त्यांच्या बँक खात्यात दीड हजार रुपये जमा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. सदर योजनेच्या माध्यमातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील पात्र महिला लाभार्थ्यांच्या खात्यात १५ ऑगस्ट रोजी पहाटे पासून दोन महिन्याचे तब्बल तीन हजार रुपये जमा होत असल्याने भाजपाचे नेते




आ. रमेशआप्पा कराड यांचा लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून महिलांनी महायुती शासनाचे आभार व्यक्त केले. यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, बन्सी भिसे, महिला आघाडीच्या सुरेखा पुरी, अनुसया फड, लता भोसले, शीला आचार्य यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

केंद्रातील नरेंद्रजी मोदी आणि राज्यातील महायुती शासन महिलांच्या हिताची जपणूक करणारे आणि महिलांसाठी विविध योजना सुरू करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे शासन आहे असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, काँग्रेसच्या काळात तोंड बघून योजना दिल्या जात होत्या मात्र भाजपा शासनाने जात धर्म न पाहता गरजू आणि पात्र सर्व लाभार्थ्यांना घरकुल, उज्वला गॅस, लाडकी बहीण, बस प्रवासात सवलत यासह विविध योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ दिला. येणाऱ्या काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या भूलथापांना अपप्रचाराला बळी न पडता विविध योजनेचा प्रत्यक्ष लाभ देणाऱ्या भाजपाच्या विजयासाठी महिलांनी बहिणींनी कष्ट घ्यावेत असे आवाहन केले.

यावेळी लता भोसले, माया घोडके, सुरेखा मुळे, ज्योती लांबोटे यांच्यासह अनेक महिलांनी आपले मनोगत व्यक्त करून महिलांसाठी सुरू केलेल्या विविध योजने बद्दल शासनाचे आभार व्यक्त केले. बहुतांशी महिलांनी आ रमेशआप्पा कराड यांना मोबाईलवर आलेले मेसेज दाखवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी अनुसया फड यांनी आभार मानले. यावेळी रोहिणी जुगल, उषा शिंदे, रुपावती हनवते, श्रुती सवयी, अन्नपूर्णा पुरी, पुष्पा आकुच, कांचन बनसोडे, मनकर्ना यमजले, रुक्मिणी माने, उमा सूर्यवंशी, राणी कांबळे, कीर्ती अवस्थी, राधा लहाडे, कल्पना मस्के, छाया जोगदंड, रमा जोगदंड, मीरा फड, वसुधा तोडकरी, मीना सूर्यवंशी, अर्चना शिंदे, मंगल शिंदे, मीना पवार, केशरबाई भुतकर, अर्चना यशवंते, अर्चना आरबाडे, सारिका बोबडे यांच्यासह महिलांची संख्या मोठी होती.

## किमान आजच्या शिक्षकांनीतरी 'जागरण' नक्की वाचावे

नुकतंच श्री.भारत सातपुते सरांचे 'जागरण' पुस्तक वाचून काढले.कोणतीही शैक्षणिक पार्श्र्वभूमी नसताना गरीब कुटुंबात जन्मलेल्या सातपुते सरांनी आपल्या बुद्धीच्या जोरावर शिक्षण घेऊन पैसा सर्व काही असतांनाही पण पैसा सर्व काही नाही हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी चांगल्या पगाराची मुंबईतील नोकरी सोडून शिक्षक होण्याचा निर्णय घेतला. खेड्यापाड्यातील गोरगरीब, शिक्षणापासून वंचित असलेल्या लेकरांना शिक्षण मिळावे म्हणून सतत संघर्ष करित कार्यरत असताना शिक्षणक्षेत्रात असलेल्या चुकीच्या गोष्टीला थारा न देता आपल्या नैतिकेला धरून त्यांनी कधीच चुकीच्या पद्धतीने काम केले नाही आणि आपल्या वरिष्ठांसहीत सहकार्यांना करू दिले नाही याचा संकटांचा, अडचणीच्या स्वरुपात मोबदला सुध्दा त्यांना पदोपदी मिळाला पण सरांनी कधीच इमानदारी सोडली नाही .चांगले काम करतांना त्यांनी अनेकांना शिंगावर घेऊन दुष्मनी वाढविली तेही परिणामाची तमा बाळगली नाही. शिक्षक म्हणजे मोठ्या पगारी असतांनाही जोडधंदा म्हणून अनेक उचापती करून कधी वरिष्ठांना हाताशी चिरीमिरी करून पैसा कमवायच्या नादात शिक्षणाकडे दुर्लक्ष करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करित आपल्या पेशाला काळीमा फासतात.अपवाद काही प्रमाणात प्रामाणिकपणे काम करणारे शिक्षक सुध्दा आहेत. आपल्या नौकरीच्या कालावधीमध्ये घडलेल्या सर्व चांगल्या वाईट गोष्टींचा उहापोह करून अनेकांची चिरफाड करून त्यांना नावांसह उघडं पाडलं आहे. मला सातपुते सरांची एक गोष्ट पटली त्यांच्या हातातून काही घडलेल्या चुका त्यांनी प्रांजळपणे पुस्तकात लिहून त्यांनी आपल्या चुकांवर पांघरूण घातले नाही हे विशेष म्हणावे लागेल. नाही तर पुस्तक त्यांनी लिहल्यावर त्यात फक्त स्तुती दिसली असती. खरं तर पैशाला सरांनी महत्व दिले असते तर त्यांनी दलालीच्या माध्यमातून खूप पैसा कमावला असता आणि एखादी शिक्षक आमदारांची निवडणूक लढली असती, कारण त्यांच्याकडे वरिष्ठांची ओळख ते राजकीय क्षेत्रातील माजी मुख्यमंत्री स्व.विलासरावजी देशमुख यांच्या सोबत असलेली ओळख त्यांना खूप काही मिळाले असते पण सातपुते सरांनी आपली नैतिकता ढासळू दिली नाही हे कौतुकास्पद आहे.महत्वाचे म्हणजे सरांनी केंद्रप्रमुख ,विस्तार अधिकारी अशा पदोन्नतीसुध्दा नाकारुन शेवटपर्यंत शिक्षक राहून अनेक विद्यार्थी घडवले.जागरण हे पुस्तक किमान आजच्या शिक्षकांनी नक्कीच वाचायला हवे. मी पत्रकारिता क्षेत्रात काम केल्याने अनेक क्षेत्रांत होणाऱ्या चांगल्या वाईट घटनांचा साक्षीदार आहे.त्यामुळे सरांनी आपल्या जागरण पुस्तकांत लिहलेले वास्तव हे चिरीमिरी करणाऱ्या लोकांच्या डोळ्यात अंजन घालणारे नक्कीच आहे. माझी आणि भारत सातपुते सरांची अजून प्रत्यक्ष भेट काय ,साधे मोबाईलवर पण बोलणे झाले नाही पण हे फक्त मी त्यांच्या जागरण ह्या पुस्तकात वाचलेल्या अनुभवातून हे लिहिले आहे. सध्या सेवा निवृत्त असलेल्या सरांची शाळाबाह्य लेकरांना शिक्षण मिळावे म्हणून जी धडपड आहे त्या धडपडीला माझ्या कडून मानाचा मुजरा आणि मनःपूर्वक शुभेच्छा.

**-पंडित प्रल्हादराव तिडके , सेनगावकर**
(मुक्त पत्रकार, वसमत .जि. हिंगोली )

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# अनाहत नादाची अनुभूती देणारा स्वरविलास संगीत दरबार



लातूर / प्रतिनिधी- लोकनेते विलासराव देशमुख हे उत्तम रसिक व संगीत जाणकार होते त्यामुळे त्यांच्या स्मृती या चिरकाल राहायला हव्यात याच उद्देशाने हा स्वरविलास संगीत दरबार यापुढे अविरत चालू राहण्यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्नशील आहोत असे प्रतिपादन स्वागत अध्यक्ष सहकार मंत्री दिलीपराव देशमुख यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

आवर्तन मासिक संगीत सभेच्या ११४ व्या मासिक संगीत सभेच्या निमित्ताने आवर्तन अष्टविनायक प्रतिष्ठान व मांजरा परिवार यांच्या वतीने लोकनेते विलासराव देशमुख यांना समर्पित स्वरविलास संगीत दरबारा चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी लातूर मधील अष्टविनायक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष माननीय प्रदीप राठी हे होते तर माजी मंत्री अमित देशमुख व आमदार धीरज देशमुख यांची विशेष उपस्थिती होती दयानंद सभागृहामध्ये झालेल्या या संगीत दरबार मध्ये मेवाती घराण्याचे जगप्रसिद्ध गायक पंडित संजीव अभ्यंकर यांना गायनासाठी आमंत्रित केले होते .

पंडितजींनी आपल्या गायनाची सुरुवात पूर्वी रागाने केली तसा पूर्वी राग फारसा ऐकावयास मिळत नाही परंतु पंडितजींनी या रागामध्ये दोन्ही मध्यमानचे विविध सौंदर्यपूर्वक रागाची बाढत करुन रसिकांवर स्वर मोहिनी केली .या रागात विलंबित एकताल मधील बंदिश अरज सुनो श्री श्यामला माता मोरी व त्यानंतर द्रुत तीनताल बंदिश दुर्गे भवानी दयानी सकल जगत जननी दुःख हरनी या दोन्हीही बंदिश स्वतः पंडित संजीव अभ्यंकर यांनीच रचलेल्या होत्या, पूर्वी रागानंतर राग रागेश्री मधील बंदिश माइरी मेरो श्याम लग्यो संग डोले। व द्रुत तीनताल साजना रे जिया लागत ना। यानंतर पंडितजींनी वातावरणाला पोषक राग मेघ गाण्यासाठी निवडला या रागामध्ये ताल द्रुत एकताल मध्ये उमड़ घुमड़ घन गरजे कारे कारे बदरा डराये । ही स्वरचित बंदिश अतिशय तयारीने सादर केली आणि या मेघ रागाने आपल्या शास्त्रीय गायनाची सांगता केली. शेवटी ध्यान लागले रामाचे व आता कोठे धावे मन। हे केदार पंडित यांनी संगीतबद्ध केलेले अतिशय सुप्रसिद्ध अभंग गाऊन आपल्या गायनाची सांगता केली.

त्यांना समर्पक तबला साथ सुप्रसिद्ध तबलावादक रोहित मुजुमदार व संवादिनी साथ संगत सुप्रसिद्ध संवादिनी वादक निलेश साळवी यांनी केली तर युवा पखवाज वादक बंकट कुमार बैरागी यांनी पखवाज साथ संगत केली व लातूर येथील कलावंत बालाजी चौधरी यांनी टाळ साथ संगत केली , पंडितजींचे शिष्य साई पांचाळ यांनी उत्तम अशी स्वर साथ पंडितजींना दिली व तानपुरा साथ कुमारी शर्वरी डोंगरे ने केली.

याच कार्यक्रमांमध्ये चिगरी गुरुजींचे पट शिष्य विशाल जाधव यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा पंडित शांताराम चिगरी गुरुजी युवा पुरस्कार आळंदी येथील चिरंजीव स्वरित बळवंत पांचाळ याला मानपत्र स्मृतिचिन्ह व ११ हजार रुपये रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष अभय शहा व आभार प्रदर्शन डॉक्टर संदीप जगदाळे यांनी मांडले या कार्यक्रमाचे अतिशय रसाळ वाणीमध्ये वैभव कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मार्गदर्शक श्री अतुल देऊळगावकर तसेच डॉ.अजित जगताप , श्री किरण भावठाणकर नियोजन समिती प्रमुख श्री. विशाल जाधव, आवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय शहा, सचिव डॉ. रविराज पोरे, डॉ. संदिपान जगदाळे, प्रा. हरिसर्वोत्तम जोशी, संजय सुवर्णकार महेश काकनाळे, संजय अयाचित , केशव जोशी , हेमंत रामढवे, दत्ता पाटील,शंभुदेव केंद्रे, सुरेश कुलकर्णी, विनायक राठोड, निलेश पाठक,हरीराम कुलकर्णी,व्यंकटेश पांचाळ, तेजस धुमाळ,दिनकर पाटील, काकासाहेब सोनटक्के, डॉक्टर भदाडे, शशिकांत देशमुख, डॉ.वृषाली देशमुख, सौ.गीता मुंढे,डॉ. मंजुषा कुलकर्णी, देवदत्त कुलकर्णी, विवेक डोंगरे, लक्ष्मीकांत तुबाजी , प्रकाश भोकरे, खंडू जेवळीकर, यांनी परिश्रम घेतले.

# लातूर जिल्ह्याच्या स्थापना दिनी पडले ऐतिहासिक स्थळांच्या भ्रमंतीचे पहिले पाऊल

लातूर, दि. १६ : लातूर जिल्ह्याला वैभवशाली इतिहास लाभलेला आहे. या इतिहासाची साक्ष देणारी अनेक वारसा स्थळे जिल्ह्यात आहेत. या वारसा स्थळांची आणि त्यांच्याशी संबंधित इतिहासाची माहिती नवीन पिढीला व्हावी, यासाठी इतिहासप्रेमी नागरिक, इतिहास अभ्यासक आणि लातूर जिल्हा प्रशासनाने 'लातूर हेरिटेज वॉक' हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. आज (दि. १६) लातूर जिल्ह्याच्या स्थापना दिनापासून या उपक्रमाला सुरुवात झाली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी फीत कापून व तिरंगी बलून हवेत सोडून हनुमान चौक येथे या उपक्रमाची सुरुवात केली.

प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त पंजाबराव खानसोळे, माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, योजना शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे यांच्यासह जिल्ह्यातील इतिहास अभ्यासक, इतिहास प्रेमी शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'लातूर हेरिटेज वॉक'च्या पहिल्या पर्वाच्या उद्घाटनासाठी गंजगोलाई परिसरात सजावट करण्यात आली होती. तिरंगी पताका, ध्वज आणि जागोजागी लावण्यात आलेले ऐतिहासिक स्थळांची माहिती सांगणारे फलक, रांगोळी यामुळे परिसरात उत्साहपूर्ण वातावरण तयार झाले होते. काही विद्यार्थी वासुदेव, गोंधळी अशा वेशभूषेत, तर काही अधिकारी, कर्मचारी, नागरीक पारंपारिक वेशभूषेत हेरिटेज वॉकला उपस्थित होते. हनुमान चौक ते गंजगोलाई परिसरात दोन्ही बाजूला लातूर जिल्ह्यातील वारसा स्थळांची माहिती देणारे फलक लावण्यात आले होते.

हनुमान चौक येथून ढोल आणि बँडच्या तालावर हेरिटेज वॉकला सुरूवात झाली. गंजगोलाईला फेरी मारत उपस्थितांसमोर या वारसा स्थळांचा इतिहास उलगडण्यात आला. विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते.

हेरिटेज वॉकमध्ये सहभागी झालेले लातूरकर गंजगोलाईच्या पूर्व दरवाज्याजवळ आल्यानंतर इतिहास अभ्यासक भाऊसाहेब उमाटे यांनी लातूरचा प्राचीन इतिहास, तसेच गंजगोलाईची जुनी कमान याबाबत माहिती दिली. हेरिटेज वॉकमध्ये सहभागी झालेल्या नागरिकांसाठी गंजगोलाईच्या जुनी कमानीची हुबेहूब प्रतिकृती विकास सरकाळे, जितेंद्र जगताप, श्री.मनोज बनाळे व सचिन रणखांब यांनी तयार केली होती. एका दिवसात ही प्रतिकृती तयार करून दिल्याबद्दल जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते तिघांचाही सत्कार करण्यात आला.

हेरिटेज वॉक गंज गोलाईच्या पश्चिम दरवाज्याजवळ आपल्यानंतर याठिकाणी उभारण्यात आलेल्या स्टेजवर मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा जाज्वल्य इतिहास वर्णणारा पोवाडा प्रा. संदीप जगदाळे यांच्या चमूने सादर केला. तसेच पुरणमल लाहोटी शाळेतील विद्यार्थ्यांनी 'शंभरीची झाली गोलाई...' या गीतावर नृत्य सादर केले.

गंजगोलाईबद्दल माहिती देताना इतिहास अभ्यासक श्री.विवेक सौताडेकर म्हणाले, गंजगोलाई बाजारपेठ ही लातूरच्या इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठिकाण आहे. सन १९१७ साली दिवाळीच्या लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर गुलबर्ग्याचे सुभेदार (आयुक्त) राजा इंद्रकर्ण बहादूर यांच्या हस्ते गंजगोलाईचे उद्घाटन झाले. व्यापाराच्या, जनतेच्या सोयीसाठी तसेच सौंदर्य दृष्टिकोनातून या गंजगोलाईचा आराखडा परदेशातून शिक्षण घेऊन आलेले फैय्याजुद्दीन या अभियंत्याने तयार केला. गंजगोलाईची गोलाकार वास्तु आकाशातून पाहिली तर सूर्याची किरणे पसरल्यासारखी दिसते व ती जमिनीवरून पाहिली तर उघडलेल्या छत्रीसारखी दिसते. या गोलाकार वास्तुभोवती तब्बल १६ रस्ते एकत्रित येतात. अशी एखाद्या बाजारपेठेची वास्तू देशभरात दुर्मिळच पहायला मिळेल. या गंजगोलाई बाजारपेठेचे १९६० व १९८५ साली नूतनीकरण झाले. आजच्या गोलाकार गंजगोलाईच्या ठिकाणी पूर्वी एक दगडी उंच टॉवर व पूर्व बाजूला एक दगडी कमान होती. जी 'नांदेड वेस' या नावाने ओळखली जात होती. अशी ही सर्व सोयींनीयुक्त असलेली गंजगोलाई बाजारपेठ आज १०६ वर्षांची झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

**लातूरच्या वैभवशाली इतिहासाला उजाळा देण्याचा प्रयत्न : जिल्हाधिकारी**

लातूर जिल्ह्याला अतिशय वैभवशाली इतिहास आहे. हा इतिहास आजच्या पिढीपर्यंत पोहचावा, त्याला पुन्हा उजाळा मिळावा, यासाठी 'लातूर हेरिटेज वॉक' हा उपक्रम लातूरच्या स्थापनादिनी सुरु होत आहे. यापुढे प्रत्येक महिन्याला जिल्ह्यातील एका वारसा स्थळी भ्रमंती करण्यात येणार आहे. आपल्या जिल्ह्याचा इतिहास समजून घेण्यासाठी विद्यार्थी, युवकांनी आणि इतिहास प्रेमींनी या उपक्रमामध्ये सहभागी व्हावे. आज पहिल्याच हेरिटेज वॉकला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. इतिहास प्रेमी नागरिक आणि इतिहास अभ्यासक यांनी घेतलेल्या पुढाकारातून हा उपक्रम नक्की यशस्वी होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी व्यक्त केला.

# आ.अमित देशमुख व खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी श्रावण मासानिमित्त लातूर शहरातील अष्टविनायक मंदिरात घेतला महाप्रसाद



लातूर / प्रतिनिधी- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व लातूरचे खासदार

डॉ. शिवाजी काळगे यांनी आज गुरुवार दि. १५ ऑगस्ट रोजी दुपारी लातूर शहरातील अष्टविनायक मंदिरात जाऊन श्रावण मासानिमित्त श्री शिवशंकराचे मनोभावे दर्शन घेतले. त्याठिकाणी श्रावण मासानिमित्त उद्योग भवन मित्र मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात महाप्रसाद घेतला.

यावेळी अष्टविनायक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप राठी, रमेश राठी, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, श्याम मंत्री, हुकुमचंद कलंत्री, कमल जोधवानी, आकाश राठी, बालाप्रसाद बिदादा, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, एन.आर.पाटील, डॉ. अशोक सांगवीकर, चंद्रकांत मद्दे, कलीमोद्दीन अहमद, भारत

रेड्डी, माधव कोडेगावे विष्णुदास धायगुडे आदिसह गणेश भक्तगण उपस्थित होते.

## श्री रामलिंगेश्वर महाराजांच्या महापूजेचा उद्याचा मान धुमाळ परिवाराला

लातूर:- लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील रामलिंग मुदगड येथील श्री क्षेत्र रामलिंगेश्र्वर महाराज संजीवन समाधी मठ संस्थान येथे श्री रामलिंगेश्र्वर महाराजांनी सोळाव्या शतकात संजीवन समाधी घेतली आहे या ठिकाणी रामलिंगेश्र्वर महाराजांची पंचधातुची मूर्ती गुरुपौर्णिमेनिमित्त स्थापना करण्यात आली आहे.

या मूर्तीची महापूजा अखंड श्रावण महिन्यात भक्तांच्या हस्ते श्री क्षेत्र रामलिंगेश्र्वर महाराज संजीवन समाधी मठ संस्थान चे पाचवे मठाधिपती सदगुरू सदानंदजी महाराज यांच्या आदेशानुसार केली जात आहे . दिनांक १७/०८/२०२४ वार शनिवार ची महापूजा दैनिक समीक्षा संपादक तथा श्री क्षेत्र रामलिंगेश्र्वर महाराज संजीवन समाधी मठ संस्थान समन्वयक रामेश्र्वरजी धुमाळ यांच्या हस्ते करण्यात येणार आहे या प्रसंगी प्रसाद ठेवण्यात आला आहे तरी सर्वांनी या पूजेसाठी उपस्थित रहावे अशी नम्र विनंती मठ संस्थान ,दैनिक समीक्षा माध्यम समूह व धुमाळ परिवाराच्या वतीने करण्यात येत आहे.

## पान १ वरून

### बांगलादेशचे...

सरकारचे प्रमुख मुहम्मद युनूस यांनी मंगळवारी ढाका येथील ढाकेश्र्वरी मंदिराला भेट दिली आणि हिंदू समुदायाच्या नेत्यांना आश्र्वासन दिले की, आपण सर्व एकच आहोत आणि सर्वांना न्याय दिला जाईल.

बांगलादेशच्या आठ विभागांमध्ये हिंदूंच्या लोकसंख्येचे प्रमाण बदलत जाते. मैमनसिंगमध्ये फक्त ३.९४% हिंदू आहेत तर तेच प्रमाण सिल्हेटमध्ये १३.५१ % आहे. बांगलादेशातील ६४ जिल्ह्यांपैकी चार जिल्ह्यांमध्ये, प्रत्येक पाचवी व्यक्ती हिंदू आहे. ढाका विभागातील गोपालगंज (जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या २६.९४% हिंदू आहेत), सिल्हेत विभागातील मौलवीबाजार (२४.४४% हिंदू आहेत), रंगपूर विभागातील ठाकूरगाव (२२.११% हिंदू आहेत) आणि खुलना विभागातील खुल्ना (२०.७५% हिंदू आहेत) हे काही महत्त्वाचे विभाग आहेत. २०२२ च्या गणनेनुसार १३ जिल्ह्यांमध्ये हिंदू लोकसंख्या १५% पेक्षा जास्त आणि २१ जिल्ह्यांमध्ये १०% पेक्षा जास्त होती.

### नाशिकमध्ये...

वातावरण निर्माण झालं आहे.

नाशिकमध्ये हिंदूत्ववादी संघटनांनी बंदचे आवाहन केले होते, पण हिंदूत्ववादी संघटनांच्या रॅलीदरम्यान भद्रकाली परिसरात काही दुकाने उघडी होती, त्यामुळे संघटनांनी दुकानं बंद करण्याचे आवाहन केले. यानंतर वाद सुरू झाला आणि वादाचे रुपांतर हाणामारीत आणि नंतर दगडफेकीमध्ये झाले, यामुळे नाशिकमधली परिस्थिती तणावपूर्ण बनली आहे.

या दगडफेकीमध्ये जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच काही पोलिसांनाही दगड लागल्याची माहिती मिळत आहे.

### हरियाणामध्ये...

पैकी ४३ जागा काश्मीर विभागात, तर ४७ जागा जम्मू विभागात गेल्या आहेत. यापूर्वी केवळ ८७ जागांवर निवडणुका झाल्या होत्या.

जम्मू-काश्मिरमध्ये १० वर्षांनंतर निवडणूक होणार

जम्मू आणि काश्मिममधील ३७० कलम हटवल्यानंतर त्या ठिकाणी कोणतीही निवडणूक घेण्यात आली नव्हती. आता १० वर्षांनंतर त्या राज्यात निवडणूक होणार आहे. जम्मू-काश्मिरमधील निवडणुका घ्या अशी मागणी तिथल्या राजकीय पक्षांनी केली होती. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली होती. त्यानंतर ३० सप्टेंबरपूर्वी निवडणुकीचा निर्णय घ्या, त्याचे नियोजन करा असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाला दिले होते.

### सणासुदीमुळे...

आहेत. जम्मू-काश्मीर, हरियाणा, महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यांनंतर दिल्ली विधानसभेसाठी मतदान होईल.

यंदा जम्मू-काश्मीरच्याही निवडणुका होत असल्याने आणि तिथे लागणा-या यंत्रणेचा विचार करता आम्ही दोन-दोन राज्यांच्या निवडणुका एकत्र घेण्याचा निर्णय घेतला. तसेच जम्मू-काश्मीरची निवडणूक प्रक्रिया सुरू असतानाच मध्येच दुस-या राज्यासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे योग्य नाही. महाराष्ट्राच्या निवडणुका उशिरा घेण्यामागे इतरही कारणे आहेत. काही दिवसांनी गणोशोत्सव, पितृपक्ष, दिवाळी असे सणही येत आहेत. त्यामुळे आम्ही निवडणूक कार्यक्रमाचे त्या अनुषंगाने नियोजन करत आहोत अशी माहिती राजीव कुमार यांनी दिली आहे.

जम्मू काश्मीरमधील विधानसभा निवडणूक तीन टप्प्यांमध्ये होणार आहे. पहिल्या टप्प्यातील मतदान १८ सप्टेंबर रोजी, दुस-या टप्प्यातील मतदान २५ सप्टेंबर आणि तिस-या टप्प्यातील मतदान १ ऑक्टोबर रोजी होणार आहे. तर हरियाणातील निवडणुका एकाच टप्प्यात होणार असून १ ऑक्टोबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडेल आणि ४ ऑक्टोबर रोजी दोन्ही राज्यांतील मतमोजणी करण्यात येणार आहे. दरम्यान, यंदा जम्मू काश्मीरमध्ये १० वर्षांनंतर निवडणुका होणार असून एकूण ९० जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यामध्ये जम्मूतील ४३ आणि काश्मीरमधील ४७ जागांचा समावेश असणार आहे. निवडणूक आयोगाने जम्मूमधील सांबा, कठुआ, राजौरी, किश्तवाड, डोडा आणि उधमपूर या भागातील एक-एक जागा वाढवण्यात आली असून काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यात एक विधानसभा मतदारसंघ वाढवण्यात आला आहे.


## बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग



## घर विकणे आहे

**शिवाजीमहाविद्यालय/विद्यावर्धिनीहायस्कुलच्या पाठीमागे नई अबादी उदगीर येथील बलराम राम चंद्र येरमे यांचे घर ज्याची साईज ८० ८० दोन मजली घर ज्यात सर्व सोईनी युक्त असलेले ३१ रुम विकणे आहे.**

संपर्क : ९८२३६३२३००, ९४२३३४७७५०, ९०९६४२४०४२


# वातावरणातील बदलांमुळे सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी, पोटदुखीने नागरिक त्रस्त

**प्रशांत तांबोळकर**

शिरूरआनंतपाळ : वातावरणातील होणाऱ्या बदलांमुळे शिरूरआनंतपाळ तालूक्यातील येरोळ, हानमंतवाडी, दैठणा, साकोळ, तळेगाव दे पांढरवाडी, डिगोळ, चामरगा, कारेवाडी, धामणगाव, बोळेगाव परिसरातील अनेक गावात साथीचे आजार वाढलेत.

कडक ऊन, मध्येच ढगाळ वातावरण, हलकासा पाऊस असे वातावरणात सतत बदल होत आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून सर्दी, ताप, खोकला, डोकेदुखी, अंगदुखी, मळमळ व पोटदुखी या आजाराने नागरिक त्रस्त झालेत. मोठ्यां प्रमाणेच लहान मुलांनाही घशात खवखव होणे, कान, नाकाच्या आजारांसह सर्दी, खोकला आणि तापासारख्या साथीच्या आजारांनी घेरले आहे. तीन दिवस सतत ताप असल्यास ते टायफाईडचे लक्षण असु शकतात. येरोळ येथील प्राथमीक आरोग्य केंद्रात तसेच गावातील छोट्या खासगी दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांच्या संख्येतही दुप्पटीने वाढ झाली आहे. विविध प्रकारच्या आजारांची लक्षणे दिसताच, दुखणं अंगावर न काढता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेण्याचं आवाहन येरोळ येथील डा. वि.मा,तोटे यांनी केले आहे.

**टी.सी.हरवली आहे**

माकने गीता मोहनराव यांचे परिमल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लातूर बारावी विज्ञान पास ची टीसी आणि इतर डॉक्युमेंट लातूर ते औराद शहाजानी प्रवासादरम्यान हरवले आहे तरी कोणास सापडल्यास खालील क्रमांक संपर्क साधावा मोबा-९८६०५६००३६

## जाहीरनामा

तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार रेणापूर यांचे न्यायालय

**(दंडणिय विभाग)**

---

जन्म नोंदणी प्रमाणपत्र जाहिनामा

जा.क्र. २०२४/दंडणीय/कावि-

विषयःजन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनिकयम १९६९ च्या कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदणी आदेश होणेबाबत

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार सासरकडील नाव प्रतिभा दिगांबर पाटील रा.बुधोडा ता. औसा जि. लातूर यांनी माहेरकडील नाव प्रतिभा वामनराव मोरे त्यांचा जन्म दि. ०१/०१/१९७६ रोजी मौ. पोहरेगाव ता. रेणापूर येथे राहत्या घरी झाला असल्याने जन्म तारखेची नोंदणी ग्रामपंचायत कार्यालय पोहरेगाव येथे नोंदणी करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, सदर जन्म/मृत्यु तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात सादर करावा सदर कालावधतीमध्ये कोणचाही आक्षेप अथवा हरकत सादर न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये योग्य तो आदेश पारीत करीत. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही. सदर जाहीर प्रगटन हे आज दिनांक १२/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी दिले.

पुढील तारीख दि. २७/०८/२०२४

**तालुका दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार रेणापूर**

## जाहीरनामा

रेणापुर येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात

दिवाणी किरकोळ अर्ज नंबर- १९६/२०२४

व्यंकटी व इतर । वि निरंक

निशाणी क्र.

कोर्टाचा शिक्का

**वारसाचे सर्टिफिकेटबद्दल**

ज्यापेक्षा लक्ष्मण काशिनाथ बडे रा. चुकारवाडी ता. रेणापूर जि. लातूर हे दि २/०७/२०१९ रोजी मौजे चुकारवाडी ता. रेणापूर जि. लातूर येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार व्यंकटी काशिनाथ बड़े रा.चुकारवादी ता. रेणापूर जि. लातूर ह्यांनी या कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार, १) व्यंकटी काशिनाथ बड़े वय ६४ वर्ष धदा शेती, २) रामभाऊ काशिनाथ बड़े, वय- ५९ वर्ष, धंदा-शेती.सर्व रा चुकारवाड़ी ता रेणापूर जि लातूर अर्जदार... यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू लक्ष्मण काशिनाथ बड़े चे वारस सर्टिफिकेट देईल.

पुढील तारीखः ०९/०९/२००२४

नारीख/०८/२०२४

**क लिपिक**
**दि.न्या. क. स्तर,**
**रेणापूर**

**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर रेणापुर**


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**

स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69 98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६३८/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Khairunbi W/o Abdul Mujawar हे R/o Shekapur Tq.Udgir Dist.Latur हे दिनांक ३०.०४.२०२२ रोजी At.Shekapur Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Abdul S/o Shamsher Mujawar, Age-68, Occu-Agri R/o. At Shekapur Post Dawangaon Tq Udgir Dist. Latur
2) Anjum bee W/o Sattar sab, Age-47, Occu-HH. R/o Khatgaon Bidar
3) Khajoddin S/o. Abdul Sab Mujawar, Age-40, Occu - Agri R/o. At Shekapur Post Dawangaon Tq Udgir Dist. Latur
4) Tajoddin S/o Abdul Sab Mujawar, Age-39, Occu - Agri R/o Vilas Bhosale Shale Jawal Samta Nagar Dam road, Udgir Tq. Udgir Dist. Latur
5) Firoj S/o Abdul Mujawar, Age-35 Occu - Agri R/o. At Shekapur Post Dawangaon Tq. Udgir Dist. Latur

यांनी खालील नमुद ५ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Abdul S/o Shamsher Mujawar | 68 | Husband |
| 2) | Anjum bee W/o Sattar sab | 47 | Daughter |
| 3) | Khajoddin S/o. Abdul Sab Mujawar | 40 | Son |
| 4) | Tajoddin S/o Abdul Sab Mujawar | 39 | Son |
| 5) | Firoj S/o Abdul Mujawar | 35 | Son |

अर्जदार यांना Khairunbi W/o Abdul Mujawar या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय काम ासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Khairunbi W/o Abdul Mujawar याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २३/०९/२०२४

के.डी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, २ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६१५/२०२४ नि.क्र.

ज्यापेक्षा नामे संदिप सुर्यकांत पवार हे दिनांक २९.०८.२०१३ रोजी औरंगाबाद जि.औरंगाबाद येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Rushikesh Sandip Pawar, Age 20 yrs, Occu. Education

यांनी खालील नमुद ३ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Barkubai Suryakant Pawar | 69 | Mother |
| 2) | Nilam Sandip Pawar | 40 | Wife |
| 3) | Rushikesh Sandip Pawar | 20 | Son |

अर्जदार यांना संदिप सुर्यकांत पवार या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्याम ुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू संदिप सुर्यकांत पवार याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०५/१०/२०२४

कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा. बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६३२/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Umakant Malshetti Naubade हे दिनांक २४.१२.२०२३ रोजी Ravangaon, Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

Shivling Umakant Naubade, Age 23 yrs, Occu. Education, Applicant Res. Ravangaon Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमुद २ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1 | Sunita Umakant Naubade | 50 | Wife |
| 2 | Shivling Umakant Naubade | 23 | Son |

अर्जदार याने Umakant Malshetti Naubade या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Umakant Malshetti Naubade याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २०/०९/२०२४

ए.बी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, ४ थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## जाहिरनामा

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ८६/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार बालाजी पिता विश्वनाथ अंकुलगे व इतर ज्यापेक्षा आई नामे सिमिंताबाई उर्फ लक्ष्मीबाई भ्र. विश्वनाथ अंकुलगे हे दिनांक १४/०१/२०२० रोजी मौजे जवळगा या ठिकाणी मयत झाले असून ते मौजे जवळगा ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | सुर्यकांत पिता विश्वनाथ अंकुलगे | ७० | मुलगा |
| २) | कस्तुरबाई हवगीराव भालके | ६८ | मुलगी |
| ३) | भारतबाई वैजनाथ भालके | ६६ | मुलगी |
| ४) | सोजरबाई बाबुराव फत्तेपुरे | ६२ | मुलगी |
| ५) | प्रभाकर पिता विश्वनाथ अंकुलगे | ६० | मुलगा |
| ६) | बालाजी पिता विश्वनाथ अंकुलगे | ५८ | मुलगा |

अर्जदार बालाजी पिता विश्वनाथ अंकुलगे व इतर यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १९/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ०२/०८/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४८७/२०२४ नि.क्र. ०७

ज्यापेक्षा नामे Padmakar S/o. Prabhakar Karadkhelkar, हे दिनांक ०७.०६.२०२३ रोजी At.Sasun Hospital, Pune येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Tulja W/o. Prabhakar Karadkhelkar Deshpande, Age 66 yrs, Occu. H.H. R/o. Behind Nagar Parishad, Nai abadi Udgir Dist. Latur All R/o. At. Bamani, Tq.Udgir dist.Latur

यांनी खालील नमुद हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Tulja W/o. Prabhakar Karadkhelkar Deshpande | 66 | Mother |

अर्जदार यांना Padmakar S/o. Prabhakar Karadkhelkar, या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Padmakar S/o. Prabhakar Karadkhelkar, याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २०/०९/२०२४

डी.ए.कांबळे, कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा. बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६२८/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Saraswati Malshetti Naubade हे दिनांक ०८.०५.२०१९ रोजी Ravangaon, Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

Shivshankar Baswaraj Naubade, Age 28 yrs, Occu. Agri, Applicant Res. Ravangaon, Tal, Udgir, Dist.Latur

यांनी खालील नमुद ९ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1 | Aruna Baswaraj Naubade | 51 | Daughter in law |
| 2 | Punyawati Rajkumar Naubade | 41 | Daughter in law |
| 3 | Sunita Umakant Naubade | 50 | Daughter in law |
| 4 | Bhimashankar Baswaraj Naubade | 38 | Grandson |
| 5 | Shivshankar Baswaraj Naubade | 28 | Grandson |
| 6 | Nilesh Rajkumar Naubade | 21 | Grandson |
| 7 | Akash Rajkumar Naubade | 24 | Grandson |
| 8 | Mukesh Rajkumar Naubade | 27 | Grandson |
| 9 | Shivling Umakant Naubade | 23 | Grandson |

अर्जदार याने Saraswati Malshetti Naubade या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Saraswati Malshetti Naubade याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २०/०९/२०२४

ए.बी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, ४ थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर


## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५, २९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया, अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे, सचिव


## टि.सी. हरवली आहे

माझी माझी विशाल विनायक धावारे नावाची इयत्ता बी.एस.सी. फायनल ची टी.सी.५ /०८/२०२४ रोजी दयानंद सायन्स कॉलेज लातूर येथील गातेगाव ते लातूर प्रवासादरम्यान हरवली आहे.कोणास सापडल्यास खालिल मो.नंबरवर संपर्क साधावा मो.नं.९०९६०६०७१०

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी. गुप्ता, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६२५/२०२४ नि.क्र. ०६

ज्याअर्थी अर्जदाराचे वडील नामे Dhondiram Bhojappa Rayewar, R/o Near Bus Stand, Jalkot Tq.Jalkot Dist.Latur हे दिनांक १४.०५.२०२४ रोजी Jalkot Tq.Jalkot Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

Raghvendra Dhondiram Rayewar, Age 56 yrs, Occu. H.H. R/o Near Bus Stand, Jalkot Tq.Jalkot Dist.Latur

यांनी खालील नमुद ३ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1 | Sharau Dhondiram Rayewar | 66 | Wife |
| 2 | Raghvendra Dhondiram Rayewar | 45 | Son |
| 3 | Vaibhav Dhondiram Rayewar | 34 | Son |
| 4 | Prachi S/o. Dhondiram Rayewar (Prachi W/o. Sandip Rudrawar) | 39 | Daughter |

अर्जदार याने Dhondiram Bhojappa Rayewar, या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय काम ासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Dhondiram Bhojappa Rayewar, याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २१/०९/२०२४

संतोष डी. शिंदे, कनिष्ठ लिपीक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुताळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६०२/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Suryakant S/o. Tatereddy Shelke हे R/o Dongarshelki Tq.Udgir Dist.Latur हे दिनांक १५.१२.२०२१ रोजी At. Dongarshelki Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Kamal @Kamalbai W/o. Suryakant Shelke, Age 61, Occu. H.H. & Agri.
2) Shivkanta W/o. Suryakant Shelke, Age 54, Occu- H.H. & Agri. Both R/o. Dongarshelki Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमुद २ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Kamal @Kamalbai W/o. Suryakant Shelke | 61 | Wife |
| 2) | Shivkanta W/o. Suryakant Shelke | 54 | Wife |

अर्जदार यांना Suryakant S/o. Tatereddy Shelke या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय काम ासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Suryakant S/o. Tatereddy Shelke याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १९/०९/२०२४

के.डी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, २ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा. बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६१६/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Devidas Vinayak Kapale हे दिनांक १२.०२.२०१२ रोजी Kumdal, Udgir, Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

Annapurna Vinayak Kapale, Age 75 yrs, Occu. Homemaker Applicant R/o. Kumdal, Udgir, Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमुद एकमेव व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1 | Annapurna Vinayak Kapale | 75 | Mother |

अर्जदार याने Devidas Vinayak Kapale या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Devidas Vinayak Kapale याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १०/०९/२०२४

ए.बी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, ४ थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्राचा जाहिरनामा

मा.एस.डी. वडगावकर ३ रे दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर अहमदपुर यांचरू न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३९२/२०२४ नि.क्र. ७

ज्याअर्थी नामे गंगाराम शंकरराव गोरे हे दिनांक १९.०१.१९९२ रोजी रा. हडोळती ता.अहमदपुर जि.लातूर येथे मयत झाले आहेत. व अर्जदार उमाकांत गंगाराम गोरे रा. हडोळती ता.अहमदपुर जि.लातूर

यांनी खालील नमुद ५ हे मयताचे वारसदार असून

| अ.क्र. | वारसाचे नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | सरस्वती भ्र. गंगाराम गोरे | ६८ | पत्नी |
| २. | उमाकांत पि. गंगाराम गोरे | ४८ | मुलगा |
| ३. | बसवेश्वर पि. गंगाराम गोरे | ४५ | मुलगा |
| ४. | संतोष पि. गंगाराम गोरे | ३५ | मुलगा |
| ५. | रुचीता भ्र. संग्राम भुरे | ३८ | मुलगी |

अर्जदार यांना गंगाराम शंकरराव गोरे या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्याम ुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू गंगाराम शंकरराव गोरे याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १३/०९/२०२४

कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, अहमदपुर
सहाय्यक अधिक्षक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, अहमदपुर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६३५/२०२४ नि.क्र.

ज्यापेक्षा नामे देविदास विश्वनाथ कुंभार हे दिनांक ०९.०४.२०१६ रोजी गदग (कर्नाटक) येथे मयत झाले आहेत. व अर्जदार नं. १ ते ३

1) Rushikesh Sandip Pawar, Age 20 yrs, Occu. Education

यांनी खालील नमुद ३ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Kaushalbai Devidas Kumbhar | 57 | Wife |
| 2) | Govind Devidas Kumbhar | 30 | Son |
| 3) | Gopal Devidas Kumbhar | 29 | Son |

अर्जदार यांना Devidas Vishwanath Kumbhar या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Devidas Vishwanath Kumbhar याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०५/१०/२०२४

कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६३४/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Balbhim S/o. Kishanrao Kulkarni हे R/o Udgir Tq.Udgir Dist.Latur हे दिनांक १०.०६.२०२४ रोजी At. Udgir Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Radheshyam S/o. Balbhimrao Walsangkar@Kulkarni, Age 44, Occu- Business
2) Ashabai W/o. Balbhimrao Kulkarni Age 68, Occu. H.H. Both R/o. Brahman Galli, Udgir Tq.Udgir Dist.Latur
3) Archana W/o Giridhar Kulkarni, Age 46, Occu- H.H. R/o. Salbatpur Tq. Madnur Dist. Nizamabad (Telangana State)

यांनी खालील नमुद ३ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Radheshyam S/o. Balbhimrao Walsangkar @Kulkarni | 44 | son |
| 2) | Ashabai W/o. Balbhimrao Kulkarni | 68 | Wife |
| 3) | Archana W/o Giridhar Kulkarni | 46 | Daughter |

अर्जदार यांना Balbhim S/o. Kishanrao Kulkarni या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय काम ासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Balbhim S/o. Kishanrao Kulkarni याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १९/०९/२०२४

के.डी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, २ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा. बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६२४/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Prabhu Gunwantrao Patil हे दिनांक २२.०९.२०२० रोजी Malkapur, Udgir, Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1 Lalita W/o. Prabhu Patil, Age 58 yrs, Occu. Homemaker,
2 Jyoti W/o. Sidrameshwar Shetkar, Age 40 yrs, Occu. Homemaker,
3 Deepak S/o. Prabhu Patil, Age 38 yrs, Occu. Service,
Applicant All Res. Malkapur, Udgir Dist.Latur. Temp. Add : Nanded Road, Udgir Tal Udgir Dist.Latur

यांनी खालील नमुद ३ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1 | Lalita W/o. Prabhu Patil | 58 | Wife |
| 2 | Jyoti W/o. Sidrameshwar Shetkar | 40 | Daughter |
| 3 | Deepak S/o. Prabhu Patil | 38 | Son |

अर्जदार याने Prabhu Gunwantrao Patil या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Prabhu Gunwantrao Patil याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २०/०९/२०२४

ए.बी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, ४ थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

# जनसंवाद पदयात्रेत लातूरकरांनी मांडल्या रस्ते, पाणी अन् लाईटच्या अडचणी



लातूर / प्रतिनिधी– मांझ लातूर संवाद लातूरकरांशी या माध्यमातून जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी युवा नेते अजित पाटील कव्हेकर यांनी जनसंवाद पदयात्रा सुरू केली. भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या मार्गदर्शनातून काढण्यात आलेल्या जनसंवाद पदयात्रेमध्ये व्यंकटेश नगर, अजिंक्य सिटी, अजिंक्य मेगा सिटी, माऊली नगर, नवीन रेणापूर नाका या भागातील नागरिकांनी युवा नेते तथा भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्याकडे त्या–त्या भागातील रस्ते, पाणी व लाईटच्या अडचणी मांडल्या आणि युवा नेते अजितभैय्यांनीही माझं लातूर संवाद लातूरकरांशी या माध्यमातून काढण्यात आलेल्या जनसंवाद पदयात्रेतून समोर आलेल्या लातूरकरांच्या सर्व अडचणी सोडविण्याचा संकल्प बोलून दाखविल्यामुळे लातूरकरांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित होत आहे.

यावेळी या पदयात्रेला जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस शिरीष कुलकर्णी, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस निळकंठराव पवार, जिल्हा सरचिटणीस प्रविण सावंत, जेएसपीएम संस्थेच्या संचालिका आदितीताई अजित पाटील कव्हेकर, भाजपा युमोच्या सरचिटणीस ॲड.शितल पाटील, ओबीसी महिला आघाडीच्या हेमा येळे, भाजपा युमो सोशल मिडीयाच्या जिल्हाध्यक्षा संगिता शिंदे, मंडलाध्यक्ष ललीत तोष्णिवाल, प्रमोद गुडे, संजय गिर, चंद्रकांत खटके,मुन्ना हाशमी, बस्वराज सुलगुडले, अजय भूमकर, नेताजी मस्के, उत्तम सूर्यवंशी, तानाजी झुंजे, ॲड.गणेश गोजमगुंडे, रविशंकर लवटे, शशिकांत हांडे, सागर घोडके, संतोष तिवारी, संतोष जाधव, राहुल बुकटे, अरूण जाधव, आकाश बजाज,ऋषिकेश क्षिरसागर, पंकज शिंदे, गजेंद्र बोकण, ॲड.पंकज देशपांडे,प्रेम मोहिते, चैतन्य फिस्के, जननायक महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्ष सहारा शेख, माजी पंचायत समिती सदस्य दिपमाला मस्के, प्रतिभा पाटील, आकाश पिटले, अभिजीत मुनाळे, दूर्गेश चव्हाण, योगेश गंगणे, सचिन जाधव यांच्यासह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी या जनसंवाद पदयात्रेदरम्यान श्री वनमाळी बालाजी मंदिर, व्यंकटेश नगर मंदिर कमिटीच्यावतीने युवा नेते अजित पाटील कव्हेकरांचा सत्कार करण्यात आला. तसेच नागोराव बोरगावकर, सतीश माने, शामराव मोरे, बालाजी माळी, तानाजी घुटे, पांडूरंग बिदादा,माजी नायक तहसिलदार प्रभू जाधव, व्यंकटेश विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक गंगाधर अप्पा कपाळे, बाळासाहेब कपाळे, विलास जोशी, ॲड सी.पी. आगरकर, उद्योजक अनिल गुरमे, नयमुद्दीन शेख, किरण अंधारे, शिवाजी जाधव, रामलिंग मदने, सतीश पिसाळ, किशोर इंगळे, सचिन मानूरकर, सिध्देश्वर आलमले, भाजपा युमोचे चिटणीस अदित्य फफागिरे यांनी जनसंवाद पदयात्रेतील भेटीरम्यान युवा नेते अजित पाटील कव्हेकर यांचा पारिवारीक सत्कार करून त्यांच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व शेवटी नवीन रेणापूर नाका परिसरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकातील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी या जनसंवाद पदयात्रेला भाजपा, भाजपा युमोचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माऊली नगर अजितभैय्यांच्या पाठीशी व्यंकटेश नगर भागासह अजिंक्य सिटी, चिंतामनी गणेश मार्गे नवीन रेणापूर नाक्यावरून माऊली नगर परिसरातील भाजयुमोचे चिटणीस अदित्य फफागिरे यांच्या निवासस्थानी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, युवा नेते अजित पाटील कव्हेकर यांनी जनसंवाद पदयात्रेदरम्यान भेट दिली असता माऊली नगर भागातील नागरिकांनी आम्ही भाजपाच्या सदैव पाठीशी आहोत, परंतु आमच्यासाठी रस्ते, पाणी आणि लाईटची सुविधा द्या. या पुढील कालावधीतही आम्ही आपल्या सोबत आहोत, असा विश्वास देऊन कव्हेकर परिवाराचा यथोचित सत्कार केला. यावेळी या भागातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मुख्यमंत्री भावा शी राज्यातील लाडक्या बहिणींचा संवाद; लातूर जिल्ह्यातील महिलांचीही कार्यक्रमाला उपस्थिती




लातूर, / प्रतिनिधी– कालपासून (दि. १४ ऑगस्ट) मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या दोन हप्त्यांची तीन हजार रुपये इतकी एकत्रित रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा होण्यास सुरूवात झाली आहे. आजपर्यंत राज्यातील सुमारे ८० लाख भगिनींच्या खात्यात प्रत्येकी तीन हजार रुपये जमा झाले असून या लाभार्थ्यांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रातिनिधीक स्वरूपात दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला. त्यावेळी लाभार्थी भगिनींनी आपल्या भावना व्यक्त करताना, मी आता मुख्यमंत्र्यांची बहीण आहे...अशी नवीन ओळख निर्माण झाल्याचे सांगत मनमोकळेपणाने आपल्या मुख्यमंत्री भावाशी संवाद साधला. लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथूनही काही लाभार्थी महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

जिल्ह्यातील अनेक महिलांच्या खात्यावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे तीन हजार रुपये जमा झाले आहेत. यापैकी काही महिला आज जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित होत्या. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे यांचीही यावेळी उपस्थिती होती.

यावेळी मनोगत व्यक्त करताना चिंचोली राववाडी येथील शेतमजुरी करणाऱ्या उषा सगर म्हणाल्या की, आमच्या सारख्या शेतमजुरी करणाऱ्या महिलांना अनेकदा इतरांकडे पैशासाठी हात पसरावा लागत होता. मात्र, आता प्रत्येक महिन्याला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दीड हजार मिळणार असल्याने फार मोठी मदत होणार आहे. ही योजना सुरु केल्याबद्दल आम्ही शासनाचे आभारी आहोत. याच गावातील शेतमजुरी करणाऱ्या हलीमा अजीज सय्यद यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे तीन हजार बँक खात्यात जमा झाल्याबद्दल शासनाचे आणि मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. या पैशामुळे मुलांच्या शिक्षणासाठी आणि कुटुंबाच्या खर्चासाठी मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उदगीर तालुक्यातील लोहारा येथील रहिवासी आणि सध्या लातूर येथे राहत असलेल्या स्वाती सुडे यांनी सांगितले की, शिवणकाम करून कुटुंबाला हातभार लावण्यासाठी मी शिवण क्लास पूर्ण केला आहे. आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून मिळालेल्या पैशातून मी नवीन शिलाई मशीन घेणार आहे. यातून स्वतःचा शिलाईचा व्यवसाय सुरु करणार असल्याचे त्या म्हणाल्या.

लातूर येथील अश्विनी खंदाडे यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता खात्यात जमा झाल्याचे सांगून आनंद व्यक्त केला. तसेच या पैशामुळे घर खर्चासाठी फार मोठी मदत होणार असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आणि शासनाचे आभार मानून पाखर सांगवी येथील सीमा नंदगवळी यांनी या योजनेतून दरमहा जमा होणाऱ्या रक्कमेतून नवीन शिलाई मशीन घेणार असल्याचे सांगितले.

लातूर येथील अनिता बेंबडे, सरोजनी देशपांडे यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांसाठी अतिशय चांगली असून ही योजना सुरु केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

# भारत ही वंदन आणि अभिनंदनाची भूमी आहे :अध्यक्ष आदिनाथ सांगवे



लातूर / प्रतिनिधी– भारत हा जमिनीचा एक भाग नसून राष्ट्रपुरुष आहे. भारत भूमी ही वंदन आणि अभिनंदनाची आहे असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांनी बोलताना व्यक्त केले.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याच्या ७८व्या वर्धापन दिनानिमित्त आज दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी ध्वजारोहण त्यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले आणि संस्था कार्यालय प्रमुख गुरलिंग शेटे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांच्या शुभ हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यानंतर ध्वजारोहण समारंभ संपन्न झाला. यावेळी संगीत विभागातील प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार, प्रा. सरस्वती बोरगावकर आणि त्यांच्या सर्व चमुनी राष्ट्रगीत आणि देशभक्ती गीत सादर केले. पुढे बोलताना अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, आपण सर्वांनी भारत भूमीला वंदन करून सहृदय वंदन केले पाहिजे. आपल्या राष्ट्राचा आपल्या मनामध्ये स्वाभिमान बाळगला पाहिजे. आजच्या कार्यक्रमाला मला सहभागी होता आले त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून उपस्थित सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना भारत माता की जय म्हणून स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमांमध्ये मराठी भाषा व वाड:मय, हिंदी, संगीत, राज्यशास्त्र, वनस्पतिशास्त्र आणि इतिहास विभागाद्वारे भित्तिपत्रकाचे विमोचन सुद्धा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच भूगोल शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले लिखित ग्लोबल वार्मिंग अँड डिझास्टर मॅनेजमेंट, रिमोट सेन्सेशन अँड डिझास्टर मॅनेजमेंट, अ कम्प्लीट हॅन्ड बुक ऑफ जॉग्राफी, टेस्ट बुक ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट या चार ग्रंथाचे आणि डॉ. सिद्राम डोंगरगे यांच्या टेक्स्ट बुक ऑफ फिजिक्स, केंब्रिज बुक हाऊस, कॉंटम फिजिक्स या ग्रंथाचे विमोचनही करण्यात आले.

तसेच प्रतिवर्षी महाविद्यालयाच्या ध्वजारोहणाची पूर्वतयारी करणारे माजी शिक्षकेतर कर्मचारी दिलीप स्वामी यांचाही अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .

यावेळी अभारपर मनोगत व्यक्त करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, हर घर तिरंगा उपक्रमामध्ये दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये आपल्या महाविद्यालयामध्ये आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आपल्या घरावर तिरंगा लावून अभिवादन केले त्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी राष्ट्रीय छात्र सेनेचे डॉ. अभयकुमार धाराशीवे यांना लेफ्टनंट पदी एन.सी.सी.निदेशालय, नवी दिल्ली, डायरेक्ट कमिशन मिळाल्याबद्दल अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले. यावेळी डॉ. सदाशिव दंदे, डॉ. यशवंत वळवी, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. दीपक चाटे, डॉ. मनोहर चपळे, डॉ. धोंडीबा भुरे, प्रा. विश्वनाथ स्वामी, डॉ. अश्विनी रोडे, प्रा. व्यंकट दुडिले, डॉ. गीता गीरवलकर, प्रा. मारुती माळी, प्रा. शंकर भोसले, प्रा. सागर ठाकूर, डॉ. मनोज गायकवाड, डॉ. उज्वला गायकवाड, प्रा. प्रतीक्षा मामडगे, प्रा. गोविंद पवार, प्रा. सरस्वती बोरगावकर, डॉ. गीता गीरवलकर, डॉ. भाग्यश्री दाने, डॉ. श्रीराम भालेराव यांच्यासह कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स आणि विविध शाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर

लातूर, / प्रतिनिधी: जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. सर्वसामान्य नागरिक हा विकासाचा केंद्रबिंदू असून शेतकरी, महिला, युवा वर्गासाठी शासनाने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. यामाध्यमातून सर्व समाज घटकांचा विकास साधण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले. भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रारंभी ना. बनसोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यासह अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, भारत कदम, अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सलीम शेख, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, जावेद शेख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हणमंत वडगावे, जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, पत्रकार, अधिकारी, कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते.

नारी शक्तीच्या सन्मानासाठी राज्य शासनाने सुरु केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून प्रत्येक पात्र महिलेला दरमहा दीड हजार रुपये म्हणजेच एका वर्षात १८ हजार रुपयांचा लाभ दिला जाणार आहे. जिल्ह्यातील सुमारे ३ लाख ८५ हजार महिलांनी या योजनेसाठी अर्ज केले ससून पात्र महिलांच्या बँक खात्यावर लवकरच जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे ३ हजार रुपये जमा केले जाणार आहेत. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेतून पात्र महिलांना दरवर्षी ३ गॅस सिलेंडर मोफत दिले जाणार आहेत. मुलींना मोफत व्यावसायिक उच्च शिक्षण देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यामुळे जिल्ह्यात शिक्षण घेणाऱ्या ३ हजार ७२० मुलींचे जवळपास १८ कोटी ४७ लाख रुपयांचे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क माफ होणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

राज्यातील युवकांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षित युवकांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळेल. सहा महिन्यांच्या प्रशिक्षण काळात राज्य शासन दरमहा ६ ते १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. तसेच अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शासनाकडून मदत केली जात आहे. २०२३–२४ मध्ये इयत्ता दहावीनंतरचे शिक्षण घेणाऱ्या ११ हजार ९३५ विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेतून ४३ कोटी १६ लाख रुपये शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतून ५ हजार ६६५ विद्यार्थ्यांना २२ कोटी ६५ लाख रुपये रक्कम अदा करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

मातंग समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य शासनाने अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजेच ङ्गआर्टीफ्ची स्थापना केली आहे. राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे. ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी जळकोट आणि रेणापूर येथे संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहे सुरु केली आहेत. त्यामुळे या मुलांचे शिक्षण अखंडितपणे सुरु राहण्यास मदत होणार असल्याचे ना. बनसोडे म्हणाले.

शेतकऱ्यांना वीज सवलत; कापूस व सोयाबीन उत्पादकांना अनुदान

शेतकरी बांधवांच्या साडेसात अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या कृषीपंपाला मोफत वीज पुरविण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना जाहीर केली आहे. जिल्ह्यात सुमारे १ लाख ४१ हजार शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ होईल. जिल्ह्यात विद्युत पुरवठा सुरळीत होण्यासाठी विद्युत वितरण व्यवस्था बळकट केली जात आहे. नादुरुस्त विद्युत रोहित्र तातडीने बदलून मिळावे, यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून २०० रोहित्र खरेदीसाठी निधी देण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

गतवर्षीच्या खरीप हंगामातील कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५ हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे. जिल्ह्यातील ६ लाख ८ हजार शेतकऱ्यांना हे अनुदान मिळणार आहे, असे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानातून ७० तलावातील सुमारे ३७ लाख घनमीटर गाळ उपसा करण्यात आला. यामुळे पाणी साठ्यात ३७६ कोटी लिटरची वाढ झाली. हा गाळ ९ हजार ५०० एकरावर पसरण्यात आला आहे. त्यामुळे शेती सुपीक बनण्यास मदत झाल्याचे त्यांनी सांगितले.

वयोवृद्ध नागरिकांना सहाय्य साधने खरेदीसाठी मदत; तीर्थ दर्शनही घडविणार

वाढत्या वयामुळे वृद्धांना अशक्तपणा, दिव्यांगत्वाला सामोरे जावे लागते. यावर उपाययोजना करण्याकरिता ६५ वर्षांवरील अशा नागरिकांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र यासारखी उपकरणे खरेदी करण्यासाठी मदत केली जाणार आहे. यासाठी शासनाने मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरु केली आहे. तसेच ६० वर्षांवरील नागरिकांना मोफत तीर्थक्षेत्र यात्रा घडविण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरु केली असल्याची माहिती ना. बनसोडे यांनी दिली. अंगणवाडीतील ङ्गवन स्टॉप सेंटरफ ठरतेय बालकांसाठी फायदेशीर जिल्हा परिषदेने अंगणवाडीमध्ये ङ्गवन स्टॉप सेंटरफ सुरु करण्यात आली असून आरोग्य तपासणी, लसीकरण, समुपदेशन, बाळंतविडा वाटप या सारख्या सेवा देण्यात येत आहेत. त्यामुळे बालकांच्या आरोग्यात सुधारणा झाली आहे. तसेच १७७ बालकांना असलेल्या दुर्मिळ आजारांचे वेळेत निदान होवून त्यांना संदर्भ सेवा देण्यात आली असल्याचे ना. बनसोडे म्हणाले. तसेच जिल्ह्यातील १३ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ८ आरोग्य वर्धिनी उपकेंद्रांना राष्ट्रीय गुणवत्तेचे मानांकन मिळाले आहे. आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांना राष्ट्रीय मानांकन मिळालेला लातूर हा राज्यातील एकमेव जिल्हा असल्याचे त्यांनी नमूद केले.











यशवंत
शनिवार दिनांक १७ ऑगस्ट २०२४
पान ८
उदगीर
कार्यालय :०२३८५-२५३९१८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com



## उदगीरात लसाकमच्या वतीने उत्तम कांबळे यांचे व्याख्यान

**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर येथील लसाकम शाखा उदगीरच्या वतीने विश्वव्याख्यात अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन आज रविवार दि.१८ ऑगस्ट रोजी ४ वाजता शिवाजी महाविद्यालय उदगीर येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उदयगिरी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ राजकुमार मस्के हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी थोर साहित्यिक, उत्तम कांबळे समूह संपादक दै.सकाळ नाशिक, हे उपस्थित राहणार आहेत.ते मअण्णाभाऊ साठे समजून घेताना...! या विषयावर आपले विचार मांडणार आहेत.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायम स्वरूपी सुरु राहणार- ना.संजय बनसोडे





**उदगीर (प्रतिनिधी)** राज्य शासनाने गरजू महिला-भगिनींना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेची रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली आहे. प्रत्येक पात्र महिलेला या योजनेचा लाभ मिळणार असून ही योजना कायमस्वरूपी अशीच सुरु राहणार असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी आज सांगितले. तसेच योजनेबाबत पसरविण्यात येणाऱ्या गैरसमाजावर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले.

मुख्यमंत्री माझी लाडकीबहीणयोजनेच्या लाभार्थ्यांची नावनोंदणी करणारे अधिकारी, यासाठी गावपातळी-वर काम करणाऱ्या उदगीर, जळकोट तालुक्यातील आशा सेविका, अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, बचतगटातील महिला आदी कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा आणि मार्गदर्शन मेळाव्यानिमित्त उदगीर तालुक्यातील कौळखेड येथील शिवम फंक्शन हॉल येथे आयोजित कार्यक्रमात ना. बनसोडे बोलत होते. यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर, जळकोटच्यातहसीलदार सुरेखा स्वामी, उदगीरचे गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, जळकोटचे गट विकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, उदगीर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

महिलांना दरमहा दीड हजार रुपये म्हणजेच वर्षाला १८ हजार रुपयांचा लाभ देण्यासाठीराज्यशासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेसाठी अर्ज भरून घेण्यासाठी अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिका, आशा कार्यकर्ती, महिला बचतगटाच्या सीआरपी, अध्यक्ष आणि सदस्य महिलांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यामुळे उदगीर आणि जळकोट तालुक्यातील पात्र महिलांची मोठ्या प्रमाणात ऑनलाईन नोंदणी झाली आहे. त्यामुळेनावनोंदणीसाठी काम करणाऱ्या प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांच्या कामाची दखल घेवून त्यांचा गौरव सोहळा आयोजितकरण्यात आल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

पात्र महिलांच्या खात्यावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे एकत्रित तीन हजार रुपये अनेक महिलांच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. उर्वरित पात्र महिलांच्या खात्यावरही लवकरच लाभाची रक्कम जमा होणार आहे. या योजनेसाठीअर्जकेलेल्या काही महिलांच्या अर्जात त्रुटी असल्याने ते अर्ज दुरुस्तीसाठी

* पात्र महिलांची नाव नोंदणी केलेल्या अधिकारी, कर्मचारी यांचा गौरव
* अंगणवाडी सेविका, आशा सेविका, बचतगटातील महिलांचा सन्मान
* महिलांनी बँक खात्याला आधार क्रमांक जोडण्याचे आवाहन

परत पाठविण्यात आले आहेत. तसेच काही महिलांच्या बँक खात्याला आधार क्रमांक जोडले नसल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा महिलांनी लवकरात लवकर आपल्या अर्जातील त्रुटींची दुरुस्ती करावी. ज्या महिलांच्या बँक खात्याला आधार जोडलेले नाही, अशा महिलांनी आपल्या बँकेत जावून बँक खात्याला आधार क्रमांक जोडून घ्यावा, असे आवाहन ना. बनसोडे यांनी केले.

उदगीर येथे एमआयडीसी मंजूर करण्यात आली असून याठिकाणी मोठे उद्योग सुरु होवून युवकांसाठी रोजगार उपलब्ध होतील. तसेच तालुक्यातील आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणाचे काम गेल्या पाच वर्षात करण्यात आले आहे. रस्त्याच्या विकासामुळे दळणवळण सुविधा गतिमान झाल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले.

यावेळीउपस्थित असलेल्या महिलांनी ना. बनसोडे यांना राखी बांधून त्यांचे औक्षण केले. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाल्याबद्दल आभार मानले. ना. बनसोडे यांच्या हस्ते अंगणवाडी सेविका, आशा सेविका, महिला बचतगटाच्या सीआरपी, अध्यक्ष आणि सदस्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित पदाधिकारी, अधिकारी आणि महिलांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

# गतवर्षीच्या पिकविमासाठी शेतकरी व चेअरमन संघटनेच्या वतीने सत्याग्रह




**उदगीर (प्रतिनिधी)** सन २०२३ सालातील शेतकऱ्यांचा पिकविमा तात्काळ मिळावा या मागणीसाठी उदगीर देवणी, जळकोट तालुक्यातील शेतकरी व चेअरमन संघटनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक उदगीर येथे पिकविमा सत्यागृह करण्यात आला.

२०२३ चा खरीप हंगामातील सोयाबीन आणि तूर पिकासाठी कंपनीने १०० टक्के पीक विमा उदगीर व जळकोट तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना दिला पाहिजे, ही आग्रही मागणी घेऊन चेअरमन संघटनेने हे आंदोलन केले. शेतकऱ्यांना मिळणारे प्रति हेक्टरी पाच हजार रुपये सोयाबीन अर्थसाह्य अनुदानासाठी ई-पीक पाहणीची जाचक अट रद्द करणे, तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना खरीप २०२३ चा पीक विमा (लीीं ळपीीींरपलश) देणे, शेतकऱ्यांच्या विविध योजनांसाठी असलेल्या जाचक अटी रद्द करणे, शासकीय योजना मंजुरीसाठी दलाल शासकीय कार्यालयात मोठ्या प्रमाणात वावरत आहेत ते बंद करणे, या मागण्यांसाठी अहिंसक मार्गाने पीक विमा सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

या (crop insurance) आंदोलनात ज्येष्ठ चेअरमन कोंडीराम काळोजी मोघा, हेरचे चेअरमन संगमेश्वर मिटकरी, शिवाजी पाटील तोंडचिर, बसवराजपाटील उदगीर, मनमत कोणमारे कौलखेड, अशोकराव आबा माने हळी, शिवा पाटील चिगळी, अण्णाराव गंभीरे करवंदी, श्रीरंग कुंडगीर कल्लूर, विठ्ठलराव मुळे सुकनी, धोंडीबा डावळे डावूळ ,वैजनाथ केसगिरे उमरगा, व्यंकट कुंडगीर खेरडा, ज्ञानेश्वर भांगे वाढवणा, रामराव पाटील देऊळवाडी, किशन मोरे शेल्हाळ, रामराव पाटील करखेली, रमेश बंडे दावणगाव, संतोष सोमासे वाढवणा, व्यंकट बिरादार बेलसकरका, दयानंद रोडगे देवर्जन, विवेक जाधव गंगापूर भाकसखेडा इत्यादी चेअरमन सहभागी होते. या आंदोलनाला भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, प्रहार जनशक्ती पार्टी, स्वाभिमानी शेतकरी संघटना, संभाजी ब्रिगेड या संघटनेने पाठिंबा दिला. या संघटनेच्या नेत्यांनी आपले मनोगत ही व्यक्त केले.या (crop insurance) आंदोलनामध्ये प्रामुख्याने माजी आ. मनोहर पटवारी, माजी आ. सुधाकर भालेराव, माजी नगराध्यक्ष उषाताई कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रा. डॉ. शिवाजी मुळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख चंद्रकांत टेंगेटोल, रंगा राचुरे, श्रीकांत पाटील, दत्ता सुरनर, बाळासाहेब पाटोदे, अमित खंदारे, प्रकाश रोडगे, अजित शिंदे, आशिष पाटील राजूरकर, विनोद तेलंगे, रविकिरण बेळकुंदे, ओंकार गांजुरे भालेराव जाधव यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होते.

# श्यामार्य कन्या विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा




**उदगीर (प्रतिनिधी)** येथील श्यामार्य कन्या विद्यालयात १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य, सचिव विक्रम संकाये, सहसचिव अंजुमनीताई आर्य , श्यामार्य कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापिका

तृप्ती पंडित, पर्यवेक्षक प्रवीण भोळे ,पंडित सुकनिकर सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी चव्हाण, संग्राम बिरादार, सेवानिवृत्त पटणे, अजय श्रीवास्तव, नाना चोपडे प्राध्यापक कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ मोतीपवळे, डॉक्टर कुमठेकर, चटनाळे, प्रेम कलेक्शनचे उद्योजक व अन्य मान्यवर उपस्थित होते हर घर तिरंगा अंतर्गत विद्यालयात तीन दिवस झेंडावंदन करण्यात आले. दिनांक १३ ऑगस्ट रोजी पालक अनिता येलमवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. दिनांक १४ ऑगस्ट रोजी आदर्श शिक्षक, ज्येष्ठ पत्रकार रसूल पठाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर दि.१५ ऑगस्ट रोजी श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे सचिव विक्रम संकाये यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

श्यामार्य कन्या उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राध्यापिका संगीता देशमुख व विद्यार्थ्यांच्या समूहाद्वारे गीत गायन करण्यात आले. खूप मोठ्या संख्येने विद्यार्थी वक्तृत्व, वादविवाद स्पर्धेमध्ये व देशभक्तीपर नृत्यामध्ये सहभाग घेतले होते. खूप मोठ्या उत्साहात १२५ विद्यार्थ्यांद्वारे लेझीम व मनोरा यांचे सादरीकरण करण्यात आले. त्यांना मार्गदर्शन राहुल गुरमे व श्रीहरी निडवंचे यांनी केले. स्टेज सजावटीचे कार्य कला शिक्षक विजय बैले यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतनप्पा हुरदळे तर आभार श्यामार्य कन्या विद्यालयच्या मुख्याध्यापिका तृप्ती पंडित यांनी मानले.

# महात्मा बसवेश्वरांचे महिला सक्षमीकरणाचे कार्य आजच्या समाजाला दिशादर्शक : प्रतिक्षा लोहकरे




**उदगीर (प्रतिनिधी)** बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेले कार्य आज एकविसाव्या शतकातही समाजासाठी दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष योजना लातूरच्या समन्वयक कु. प्रतिक्षा लोहकरे यांनी केले.

उदगीरवीरशैवसमाजाच्या वतीने धर्मवीर संग्रामप्पा शेटकार यांच्या ८५ वा स्मृतिदिनानिमित्त आयोजित

**:आजचे व्याख्यान:**
विद्यासागर डोरनाळीकर
विषय : तथागत गौतम बुध्द ते महात्मा बसवेश्वर

९० वा वचन सप्ताहात गुरुवार दि. १५ ऑगस्ट रोजी पहिले पुष्प गुंफण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उदगीर शहर पोलीस ठाण्याचे पो. नि. अभिषेक शिंदे होते. यावेळी विचारपीठावर वीरशैव समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापूरे उपस्थित होते. प्रारंभी महात्मा बसवेश्वर व धर्मवीर संग्रामप्पा शेटकार यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आपले विचार व्यक्त करताना कु. प्रतिक्षा लोहकरे यांनी, महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकामध्ये जातीव्यवस्था नष्ट करण्याचे कठीण कार्य केले. विचार स्वातंत्र्य व आपले मत व्यक्त करण्यासाठी विविध जातीतील शरण-शरणींना एकत्र जमवून अनुभव मंडपाची स्थापना केली. अनुभव मंडपाचे स्वरूप म्हणजेच आजचे संसद होय. सध्या महाराष्ट्र शासनाच्या वतीने महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना आहेत, मात्र या योजनेच्या लाभापासून अज्ञानाअभावी अनेक महिला वंचित आहेत. यासाठी अशा योजनांची जनजागृती समाजाच्या विविध उपक्रमांतून होणे गरजेचे असल्याचे नमूद केले. अध्यक्षीय समारोपात पो. नि. शिंदे यांनी, उदगीरवीरशैवसमाजाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाचे कौतुक करून महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची आज समाजाला गरज असल्याचे सांगितले. प्रास्ताविक व सुत्रसंचालन ॲड. महेश मळगे यांनी केले. आभार उत्तरा कलबुर्गे यांनी मानले. कार्यक्रमास समाजबांधव उपस्थित होते.

## काशिनाथ माळगे यांचे निधन



**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर येथील प्रतिष्ठित नागरिक काशिनाथ विश्वनाथ माळगे यांचेअल्पशा आजाराने दि.१६ ऑगस्ट२०२४ रोजी निधन झाले .मृत्यू समयी ते ९२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुल एक मुलगी नातवडे असा परिवार असुन त्यांच्या पार्थिव देहावर बनशेळकी रोडवरील शेतात शनिवार दि.१७ रोजी सकाळी १०वा.अत्यंसंस्कार होणार आहे. माळगे परिवारावर कोसळलेल्या दुःखात दैनिक यशवंत परिवार सहभागी आहे.

# तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत समर्थ विद्यालयाचे यश



**उदगीर (प्रतिनिधी)** तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील मल्ल शुभम गादीमोड व चंद्रकांत सुरनर यांनी उदगीर येथील क्रीडा संकुल, तळवेस येथे शुक्रवारी पार पडलेल्या तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविल्याने जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १७ वर्षे वयोगटात मल्ल गादीमोड शुभम शिवाजी याने तर १९ वर्षे वयोगटात मल्ल सुरनर चंद्रकांत गुरुनाथ याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी हे दोन्ही मल्ल पात्र ठरल्याने संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्थासदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, प्रा. बी. एस. बाबळसूरे, रसूल पठाण, क्रीडा समन्वयक किरण हाळीघोंगडे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.